# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०१/११/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०१/११/२००६ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. २६/१०/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १३) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| २) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |

**मा. सभापती सो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपला पान क्र. २ वर असा विषय होता की काशिमिरा रोडवरील टेम्पो स्टँडबाबत मागच्या मिटींगला चर्चा झालेली होती. मी त्यावेळेला मुख्यालयाचे आभार मानलेले होते. परंतु, आज ते टेम्पो त्याच स्थितीत आहेत. आम्ही आता मान्यता दिली त्याच्यानंतर ठराव झाला. तेथील टेम्पो हटविलेले नाही. मग आपण आता हयाच्यासाठी काय करायचे? ते टेम्पो दोन-चार दिवसांसाठी हटविलेले होते आणि आता पुन्हा तिथेच लागलेले आहेत. आपण याच्यावर कायमस्वरुपी काय उपाययोजना केलेली आहे? ते सांगा.

**शशिकांत भोईर :-**

मा. पीठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी एक विषय काढलेला आहे. आपला भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (प.) ला जोडणारा सबवे आहे. आपण त्याच्यासाठी चर्चा केलेली होती. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनीसुध्दा प्रश्न उपस्थित केलेला होता. आता त्या ठिकाणी रॅलिंग लावल्यामुळे त्या लोकांना जायला-यायला अडचण होत आहे. आपण हा विषय तीन महिन्यापूर्वी चर्चेला आणलेला होता. परंतु, आतापर्यंत इम्प्रुव्हमेन्ट झालेली आहे का?

**मा. सभापती सो. :-**

ते टेम्पो काढलेले नाहीत किंवा त्यांच्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही असे तुमचे म्हणणे आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते टेम्पो जबरदस्तीने काढले आणि पुन्हा लावलेले आहेत. मग आता रेल्वेच्या हद्दीमध्ये कोणी संघर्ष करायचा? ते सांगा.

**मा. सभापती सो. :-**

परंतु, ते टेम्पो पुन्हा कोण लावतो? ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

रेल्वेवाले लावतात.

**शशिकांत भोईर :-**

कारण तो रेल्वेवाल्यांचा अधिकार आहे. ते टेम्पो रेल्वेवाल्यांच्या हद्दीमध्ये आहेत. त्यामुळे आपण काहीही बोलू शकत नाही.

**मा. सभापती सो. :-**

याबाबत श्री. खतगांवकरसाहेब खुलासा करतील.

**हंसुकुमार पांडे :-**

मगर ट्रॅकके उपरसे बहुत लंबा चलके जाना पडता है ।

**रोहिदास पाटील :-**

गॅप काढला तोसुध्दा लावला. परंतु, तो गॅप कोणी लावला? तेसुध्दा सांगु शकत नाही. आपण त्या संबंधित व्यक्तीला बोलू शकत नाही.

**एस.ए.खान :-**

सुप्रिम कोर्टाने पूर्ण पॅक करण्याचा डिसीजन दिलेला होता.

**शशिकांत भोईर :-**

ते बरोबर आहे. परंतु, सबवेचे काय?

**रतन पाटील :-**

सुरक्षिततेच्या दृष्टिने सबवे होणे आवश्यक आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

ट्रॅकवरुन चालणे हा कायदेशीर गुन्हा आहे. आपण त्याबाबत काहीही बोलू शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपण यासाठी कोणाचे नांव सांगु शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्याकरिता सबवे लवकरात लवकर केला तर बरे होईल.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला गॅप कोणी काढला वगैरे सर्व काही माहिती आहे. परंतु, आपण जाहिर करु शकत नाही. आपण हा गॅप हयांनी काढला असे सांगू शकत नाही. हयांनी गॅप काढला, हयांनी गॅप लावला हे खरे आहे आणि ते तो गॅप परत काढणार हेसुध्दा खरे आहे. परंतु, कोण काढणार आहे? ते सांगु शकत नाही. परंतु, तेच लोक पुन्हा तो गॅप लावणार आहे. आम्हाला या गोष्टीचा भरपूर त्रास होत आहे. आम्ही जायचे कसे, यायचे कसे तेच आम्हाला समजत नाही. कारण त्या लोकांना त्या ठिकाणी मोठा गॅप करुन ठेवलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

ही बाब न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाने तसे आदेश दिले असतील किंवा अडचणी असतील तर आपल्या सबवेबाबतची काय प्रोसीजर आहे ती तुम्ही अॅडॉप करा.

**रोहिदास पाटील :-**

आपण सबवेबाबत बोलत आहोत. हयावर्षी सबवेचे कॉन्ट्रॅक्ट कधी सुरु होत आहे? ते समजणे आवश्यक आहे. याबाबत श्री. खांबितसाहेबांचे निवेदन आहे. तुमचे निवेदन असेल किंवा रेल्वेने कामकाज सुरु केलेले आहे. त्यांनी ते कामकाज कधी सुरु केलेले आहे, कोणाला ठेका दिलेला आहे, त्या ठेक्याची किंमत काय ठरवलेली आहे? जर किंमत ठरवली असेल तर त्याला मुदत दिलेली आहे की नाही ते समजणे आवश्यक आहे. रेल्वेचे कामकाज चालु होउ दया. कामकाज चालु झाले तर लोक समजून घेतील की ही-ही अडचण आहे आणि आपले काम चार-पाच महिन्यामध्ये पूर्ण होईल. आपले कामकाज चालू होत नाही आणि त्यांनी बंदसुध्दा केलेले नाही. आम्ही रेल्वे स्टेशनच्या जवळ पडतो. आम्हाला सगळया लोकांना तोंड दयावे लागते.

**दिपक खांबित :-**

साहेब, हयाच्यामध्ये असे झालेले आहे की मंजुरीची अंतिम स्टेज आहे. रेल्वेचे जे डेप्युटी चीफ इंजिनिअर आहेत. त्यांनी हयाच्यामध्ये असे प्रपोज केलेले आहे व आपल्याला हयाची जी क्युरी आहे ती पाठवावी लागेल. तिथे बांधणे शक्य नाही. आम्हाला सबवे पाहिजे. ती लोक ताबडतोब विषय घेतील. परंतु, आपण रेल्वेची मंजुरी आल्याशिवाय टेन्डर काढू शकत नाही. टेन्डर काढण्याबाबत रेल्वेची मंजुरी बाकी आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबितसाहेब, रेल्वेने मंजुरी मिळविणे हयाची एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया चालली पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, ती प्रक्रिया सुरु आहे. म्हणजेच प्रशासकीय ठराव सुरु आहेत.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबितसाहेब, आम्ही या ठिकाणी आपल्यावर टिका करु शकत नाही. आम्ही तुम्हाला बोलू शकत नाही, तुम्ही आम्हाला बोलू शकत नाही. फाटकाजवळ जो एक सबवे बनत होता. तो सबवे अर्धवट पडलेला आहे. आजच्या घटकेला तो बंद आहे.

**रमेश जैन :-**

वह काम चालू हो गया है ।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फाटकाजवळच्या सबवेचे काम चालू आहे.

**रतन पाटील :-**

त्या सबवेचे काम चालू आहे.

**दिपक खांबित :-**

फाटकाजवळच्या सबवेचे काम दिवाळीपूर्वी चालू झालेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते काम बंद होते. ते काम किती वेळ बंद राहिले? ते तुम्ही कधी बघितले आहे का? त्याऐवजी ते काम पूर्ण होउन तो सबवे लोकांच्या उपयोगात आला असता. आता फाटकाजवळच्या सबवेचे काम कधी चालू होईल? ते सांगा. कारण हे आता जीवनमरणाचे ठरलेले आहे.

**दिपक खांबित :-**

आपण परमिशन कार्यवाही करुया.

**रोहिदास पाटील :-**

जर तुम्ही असे सांगितले तर ते सभागृहाला आवडेल. आम्ही दोन दिवसानंतर जातो. तुम्हीसुध्दा आमच्याबरोबर चला. जर हे आमचे एग्झिक्युशन आम्ही सिटी इंजिनियर आहोत. आम्ही जातो. तुम्हाला यायचे असेल तर तुम्ही चला  या पध्दतीने तुमचे उत्तर मिळाले पाहिजे. आम्ही तुम्हाला टाईम देतो असे सांगितल्यावर ते काम पूर्ण होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण यासाठी रेल्वेची जी राईटस संलग्न कन्सल्टन्सी आहे. आपण त्यांना नेमलेले आहे. त्यांचे श्री. डेकाते म्हणून मॅनेजर आहेत. मी त्यांच्याशी दर आठवडयातून दोन वेळा वैयक्तिक बोलत असतो. त्यांनी मागच्या वेळेला असा मुददा उपस्थित केला की रेल्वेची जी परमिशन देणार आहे. त्याबाबत डी.आर.एम. म्हणजे डिव्हिजन रेल्वे मॅनेजर परमिशन देणार आहेत. त्यांनी मुददा उपस्थित केला की सबवेबाबत जो रेल्वेवरुन पास होणारा ब्रीज असेल त्याबाबत सगळयांशी चर्चा केली. तेव्हा त्याबाबत येथील लोकांचे असे म्हणणे आहे की ही लोक इकडचा ब्रीज वापरत नाहीत. चढ-उतार किंवा डायरेक्ट क्रॉसिंग करण्यापेक्षा सबवे केला तर लवकर होईल. आम्ही त्याबाबत श्री. डेकाते यांच्याशी बोलून त्यांना पुन्हा एकदा कन्व्हेन्स केले. आम्ही श्री. डेकाते म्हणजेच राईटस संलग्नच्या कन्सल्टन्टकडून पत्र दिलेले आहे. आपण महापालिकेमार्फत राईट कन्सल्टन्सीला पत्र दिले की आम्हाला सबवे पाहिजे. कारण राईटस कन्सल्टन्सी ही चांगल्या प्रकारचे काम करणार असल्यामुळे त्यांना सांगितले की तुम्ही त्यांच्याशी संलग्न बॉडी आहात. त्यामुळे तुम्ही तेवढे करा. आपण त्यांच्याकडून ते डी.आर.एम. ला परत दिलेले आहे. आम्ही त्यांना एफ.ओ.बी. ऐवजी सबवे पाहिजे असे सांगितलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला आग्रहाची विनंती करतो की तुम्ही अधिकृतपणे त्यांच्याशी एक बैठक तुमच्या केबीनला लावा किंवा आपल्या केबीनला लावा. तुम्ही त्यांच्या केबीनमध्ये वेळ घ्या. तुम्ही त्यांच्याकडून तासाभराची वेळ मागा. आपले स्थायी समितीचे संबंधित अधिकारी किंवा तीन-चार अधिकारी जातील. मिरारोड आणि भाईंदरचा विषय कधी मार्गी लावता येईल ते बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी श्री. डेकातेसाहेबांना हा विषय सांगितलेला होता. ते म्हणाले की आपण जे उत्तर दिलेले होते. ते डी.आर.एम. नावाच्या व्यक्तीपर्यंत अजूनपर्यंत खालून पोहोचलेले नाही. ते जेव्हा पोहोचेल तेव्हा आपण त्यांच्याकडून मिटींग लावायची आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही श्री. खांबितसाहेबांकडून काम करुन घेतो. एकऐवजी अनेक कामे करुन घेतो. आम्ही त्यांना धन्यवाद देतो. जर अनेक कामे करायची असतील तर आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचु. आम्ही तुमच्या केबीनमध्ये अर्धा तास का बसतो? कारण त्यांची जी अडचणींची कामे होती. तुम्ही त्यांना लगेच सिग्नल देउन टाकला. जर आपण डी.आर.एम. ची वेळ घेतली तर ते त्यांच्या संबंधित अधिका-यांना बोलावतील. ते त्यांच्या कन्सल्टन्ट ऑफिसरना बोलावतील. आपल्या कन्सल्टन्ट ऑफिसरना बोलावतील. तुम्हाला बोलावले किंवा नाही बोलावले तर तुम्ही तुमचे काम करा. महापालिकेचे अधिकारी होते, नगरसेवक होते, रेल्वेचे अधिकारी होते. जे काम उदया होणार आहे ते काम आज होईल. तुम्ही बोलता की डी.आर.एम. कडून टाईम घ्या. तुम्ही सिटी इंजिनियर आहात. सिटी इंजिनियर टाईम घेउ शकतो. आमच्या मिरा भाईंदर हददीतील रेल्वेच्या ज्या समस्या

आहेत. त्या सोडविण्यासाठी आम्हाला एक तास पाहिजे. आम्हाला ऑफिशियली पाहिजे. आपल्याकडे एखादा वेळेला आरोग्याचा अधिकारी नसतो, बांधकामचा अधिकारी नसतो. ती लोक त्यांचे अधिकारी ठेवतील. आपले कन्सल्टन्ट म्हणून आपण जायचे आहे.

**रतन पाटील :-**

ही एक चांगली सुचना आहे. आपण या आठवडयात लगेच पत्र देउन कळवूया.

**शशिकांत भोईर :-**

सिटी इंजिनियरसाहेब, आपला जो महानगरपालिकेतर्फे सबवेचा फॉलो-अप होता. त्याबाबत मला असे सांगायचे आहे की तुम्ही एफ.ओ.बी. आता काढता.

**रोहिदास पाटील :-**

आपण एफ.ओ.बी. चा आग्रह धरलेला नव्हता.

**हंसुकुमार पांडे :-**

सिर्फ रेल्वेने बोला है ।

**फॅरो ग्रिटा :-**

त्यांनी फक्त सजेस्ट केलेले आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

रेल्वेने फक्त सजेस्ट केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, मी या ठिकाणी असे सांगू इच्छितो की आता सिटी इंजिनियरसाहेबांनी सांगितले त्याप्रमाणे राईटस कंपनीला कॉन्टॅक्ट केलेला होता. त्यांनी हेच सांगितले की रेल्वेने सबवे बांधायला नकार दिलेला आहे. त्यांनी एफ.ओ.बी.बाबत सांगितले. त्यावेळेला मी त्यांना सांगितले की आता आपण कसे पैसे भरु शकतो? आपले जे मा. खासदार श्री. प्रकाश परांजपे आहेत. मी त्यांना भेटलो होतो. आपला रेल्वेचा सबवे पेंन्डिंग असल्यामुळे डी.आर.एम ची बैठक घेण्याबाबत मी त्यांना सांगितलेले होते. परंतु, आपल्या पालिकेला रेल्वे डिपार्टमेन्टकडून अजिबात सहकार्य मिळत नाही. त्यांनी पुढच्या हप्त्यापर्यंतची वेळ दिलेली आहे. डी.आर.एम. वेळ घेउन आपल्याला सांगणार आहेत. आपल्याला त्याप्रमाणे त्यांच्याकडे जायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला त्या दिवशी आग्रह केलेला होता की आपण एम.पी. ला विश्वासात घेता की नाही. तुम्ही एम.पी.ना विश्वासात घ्यायला पाहिजे. तुम्ही एम.पी.ना कळवा. एम.पी.ना बोलावून घ्यायला सांगा. आपल्याला त्याबाबत कळू दे. आपण तेवढे केले पाहिजे. जेणेकरुन, आपण एकत्र राहतो. आपले खासदार आहेत, आमदार आहेत, लोकप्रतिनिधी आहेत, अधिकारी आहेत. आपण ती बैठक घेतली तर आपल्याला ते फायदेशीर ठरेल. आपण असे करता-करता वेळ निघून जाईल. आपले काम थांबून राहिल. परंतु, आपले काम होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेबांची मान्यता असेल तर मी पुन्हा एक प्रश्न विचारतो की आपली अनधिकृत बांधकामाबाबत बरीच चर्चा झालेली होती. आपल्या शहरामध्ये अनधिकृत बांधकामे जोरात चालू आहेत. त्याच्यामध्ये वर्सोवाचे शेल्टर हॉटेल पाडलेले होते. ते हॉटेल पुन्हा जागेवर जसेच्या तसे उभे राहिलेले आहे. आपल्या या विभागातील ए.टी.पी.च्या अधिका-यांनी परवानगी दिलेली आहे. अशा ज्या अनेक इमारती पाडलेल्या होत्या. आपण नाहक पैसे खर्च करुन त्या इमारती तोडल्या. त्यामुळे आपले नुकसान झालेले आहे. परंतु, त्या इमारती जागेवर पुन्हा उभ्या राहिलेल्या आहेत. त्याच्यावर सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचे अनधिकृत बांधकामे कशी होतात? असे वक्तव्य होते. त्या मानाने आपले प्रशासन ढिले आहे. आपण अनधिकृत बांधकामांना प्राधान्य देतो. म्हणजे नगरसेवक किंवा स्थायी समिती सदस्य जितके बोलतात ते काहीही नाही. एका कानाने ऐकायचे आणि एका कानाने सोडायचे असे चाललेले आहे. त्याबाबत प्रशासनाने खुलासा केला तर चांगले होईल.

**रोहिदास पाटील :-**

नेहमी चांगली कामे करताना दोन अनुभव येत असतात. या ठिकाणी रेल्वेच्या पोलचा विषय आला म्हणून मी बोलतो. त्यांनी पोल काढला. पोल काढताना ज्याने बघायला पाहिजे त्यांनी बघितले. आपण पाहिजे त्यावेळेला बोलू शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

श्री. खतगांवकरसाहेबांचे या संदर्भात पान क्र. १२ वर एक वक्तव्य होते. तुम्ही पाचवा पॅरेग्राफ बघा. आपल्या जवळपास खुप मोठया प्रमाणात फ्लॅट उपलब्ध होणार आहेत. त्यांचे वक्तव्य हाउसिंग फॉर डिस-हाउसिंगबाबत होते. आपल्याला त्याच्यापुढे हाउसिंग फॉर डिस-हाउसिंग म्हणजे संक्रमण शिबिर बांधायचे असेल तर आपण उर्वरित जागेपैकी लॅन्ड निगोसिएशन किंवा ॲक्विझीशन करुन ती लॅन्ड उपलब्ध करुन घेउ. आपल्याला हाउसिंग फॉर डिस-हाउसिंग महापालिकेच्या निधीतून कायमस्वरुपी संक्रमण शिबिर काढण्यासाठी घ्यायचा आहे. आपण तिथे हाउसिंग फॉर डिस-हाउसिंग रिझर्वेशन केले. आपण ती जागा संक्रमण शिबिरसाठी घेउ शकतो का? आपल्या अन्य जागा कुठे-कुठे आहेत? त्यांनी दोन्ही जाहिर केलेले आहे. म्हणून मी त्यांना

माझा विषय बरोबर आहे असे सांगतो. माझे सांगण्याचे एवढेच तात्पर्य आहे की हाउसिंग फॉर डिस-हाउसिंगच्या ठिकाणी आपण आरक्षण चेन्ज करणार आहोत का? मग आपल्याला ते ३७ खाली आणावे लागेल. आपल्याला तिथे आणखी संक्रमण शिबिर म्हणजे उर्वरित जागा असेल तर तिथे संक्रमण शिबिरचा विचार करता येउ शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

संक्रमण शिबिराबाबतचा विषय कुठे आहे?

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. १२ वर भरपूर आरक्षणे आहेत असे तुमचेच वक्तव्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

या ठिकाणी दि. २७/७/२००६ चे इतिवृत्तांत अंतिम करताना सन्मा. सदस्यांनी जी शंका उपस्थित केलेली आहे. त्याबाबत खुलासा करतो की आपण पान क्र. १२ वर तत्कालीन सभेमध्ये संक्रमण शिबिराचा विषय आलेला होता. संक्रमण शिबिराच्या अनुषंगाने महापालिके अंर्तगत आरक्षित जागेवर ॲकोमडेशन डेव्हलपमेन्ट रिझर्वेशन परवानग्या दिलेल्या आहेत. आपल्याला त्याच्यामधून जे फ्लॅट उपलब्ध होत होते. त्याबाबतची चर्चा त्यावेळेला चर्चेला आलेली होती. ती चर्चा करित असताना त्या जागेचे एकूण क्षेत्र आणि आतापर्यंत दिलेल्या बांधकाम परवानग्या हयासुध्दा हया चर्चेत आलेल्या होत्या. बांधकाम परवानगी दिलेले क्षेत्र आणि टोटल रिझर्वेशनचे क्षेत्र विचारात घेता खूप मोठया प्रमाणात आणखी जागा त्या ठिकाणी शिल्लक आहे. आपण ती जागा निगोसिएशन किंवा लॅन्ड ॲक्विझीशनने उपलब्ध करुन घेउन त्या ठिकाणी संक्रमण शिबिर बांधू शकतो असा मी खुलासा केलेला होता.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही जो खुलासा केलेला आहे तो बरोबर आहे. परंतु, ती जागा किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

या ठिकाणी नमुद केलेली एकूण १६,२३४ चौ.मी. जागा आहे.

**शशिकांत भोईर :-**

ती जागा किती आहे? या ठिकाणा आरक्षण १२२ (अ) मध्ये किती जागा आहे? ती जागा किती हेक्टरची आहे? जर समजा आपात्कालीन परिस्थिती आली तर आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये धोकादायक इमारती भरपूर आहेत. जर त्यापैकी एखादी बिल्डिंग कोसळली आणि तुम्हाला त्या ठिकाणी संक्रमण शिबिर बांधून त्या लोकांना सुखसुविधा उपलब्ध करुन दयायच्या असतील तर आपल्याला त्या ठिकाणी ग्राउन्ड बांधणे आवश्यक आहे. तर अशी किती हेक्टर जागा असेल ते सांगा. दोन गुंटे जागा घेतली तर त्याच्यामध्ये संक्रमण शिबिर होउ शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

दोन गुंटे जागा उपलब्ध नाही.

**शशिकांत भोईर :-**

जे नागरिक फ्लॅटमध्ये राहतात. ते संक्रमण शिबिरच्या तंबुमध्ये राहतील का? आम्हाला याबाबत खुलासा हवा आहे. जर आपण त्यांना दोन-तीन दिवसांसाठी असे मोगम राहण्याबाबत उत्तर दिले तर ती जागा किती एकर लागेल त्याचा फॉरमॅट दिलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्याचे नियोजन करण्यासाठी अशाप्रकारची कार्यवाही करुन आपल्याला जागा उपलब्ध होउ शकते असे माझे म्हणणे होते. समजा, भविष्यात आपल्याला महापालिकेला संक्रमण शिबिर बांधायचे आवश्यकता असेल तर आपल्याला त्याच्यासाठी जागेचा प्रॉब्लेम भासणार आहे. त्याच्यासाठी जागा कशी उपलब्ध होउ शकते ते मी या ठिकाणी नमुद केलेले आहे. सी.आर.झेड. चा भाग जाउनसुध्दा पाच-सहा एकर जमीन शिल्लक राहते.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही संक्रमण शिबिर करुन घेणार आहात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण ए.टी.पी. ला त्यावेळेला सुचना दिलेल्या होत्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, जर आरक्षण क्र. २२२ (अ) म्हणजे संक्रमण शिबिरचा जो विषय आहे. आपण हे आरक्षण ३७ खाली करु शकत होतो. आपण त्याच्यामध्ये हा विषय परस्पर महासभेपुढे आणावा.

**रतन पाटील :-**

हा विषय मागच्या महासभेमध्ये पास झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

परंतु, संक्रमण शिबिराची आताची काय पोझीशन आहे? ते सांगा.

**मा. सभापती साो. :-**

आपल्या ताब्यात त्यांची ओनरशिप आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपले रिझर्वेशन आहे आणि त्यांची ओनरशिप आहे. त्याच्यामध्ये काही भाग सी.आर.झेड.चा आहे. काही भाग रेसिडेन्शियल डेव्हलपमेन्टसाठी अलाउड आहे.

**रोहिदास पाटीलः-**

परंतु, त्यांच्या जागेवर एवढया मोठया प्रमाणावर असलेल्या रिझर्वेशनसाठी मालक सहमत आहे का? त्यांचे यु.डी.कडे डिलीट करायचे प्रयत्न चालू आहेत का? आपल्याला नुसता मॅसेज येतो. आपल्याकडे जी ५७ अशी रिझर्वेशन आहेत की जी फक्त मॅसेज आहेत. ती बदलली आहेत आपल्याकडे याची नोंद आहे का? आपण ए.टी.पी. ला पत्र देतो, मा. आयुक्तांना पत्र देतो. आपल्याकडे जी रिझर्वेशन बदल झालेली असतात. तुमच्याकडे त्यांचे जी.आर. येतात. ते कुठेतरी पब्लिश करा. आपला नकाशा जुनाच आहे. नकाशावर नुसते आरक्षण नमुद केलेले आहे. मग अक्षरशः बघायला गेले तर तिकडे आरक्षण बदलले आहे असे आढळून येते. याची जाणीव सभागृहाला कोण देईल आणि कधी देईल. सभागृहाला किंवा नागरिकांना किंवा जे कोणी इन्टरेस्टेड असतील त्यांना याची जाणीव व्हायला पाहिजे. परंतु, आपल्याकडे तसे झालेले दिसुन येत नाही. आपण जो प्लॅन पूर्वी पब्लिश केलेला होता. तोच प्लॅन आजही ए.टी.पी.कडे आहे. आजही प्रदर्शनिय भागात तोच प्लॅन आहे. वास्तविक महापालिकेच्यावतीने नवीन आलेल्या अमेन्डमेन्ट करुन हे प्लॅन आरक्षण बदललेले आहे. परंतु, आपण याची माहिती कुठेही देत नाही. लोकांना याची माहिती करुन देणे हे आपले कर्तव्य आहे की नाही ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

डेव्हलपमेन्ट प्लॅननंतर मॉडिफिकेशन होत असतात. त्या सरसकट परत रिपब्लिश केल्या जात नाहीत. फक्त पार्ट प्लॅनच रिपब्लिश केले जाते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याच्याशी सहमत असायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे सांगू इच्छितो की परत त्याच्यामध्ये दुरुस्ती करून पूर्ण प्लॅन रिपब्लिश करा असे होत नाही. फक्त प्लॅनचा पार्ट प्लॅन होतो.

**रतन पाटील :-**

कोणतेही आरक्षण बदली करताना प्रथम महासभेची मंजुरी असावी लागते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण म्हटल्याप्रमाणे मंजुर प्लॅनमध्ये जे बदल झालेले आहेत. त्यांचे चार्ट करुन आपण त्याची माहिती पब्लिश करु शकतो. आपण तशा सुचना संबंधितांना देउया.

**रोहिदास पाटील :-**

ती माहिती फक्त तुम्हाला आणि आम्हालाच होते. अन्य कोणालाही माहिती होत नाही. तुम्ही माहिती सांगायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

संबंधित मंजुर प्लॅनमध्ये आतापर्यंत शासनाकडून ज्या सुधारित सुचना किंवा मॉडिफिकेशन झालेले आहे. त्याच्या स्थलदर्शनी पाहणीसाठी तो तक्ता आणि त्याची माहिती पब्लिश करण्यासाठी आपण ए.टी.पी.ला सुचना देउया.

**जेन्वी आल्मेडा :-**

पान क्र. १२ वर थोडीशी दुरुस्ती आहे. आपण विकासकाला परवानगी देणार आहोत की विकास कामाला परवानगी देणार आहोत? ते सांगा.

**नगरसचिव :-**

आपण विकास कामांना परवानगी देणार आहोत.

**जेन्वी आल्मेडा :-**

पान क्र. १२ वर विकासकालाऐवजी विकास कामांना असे पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्याला हाउसिंग फॉर डिस-हाउसिंगचे फ्लॅटस ऑक्टोबर महिन्यामध्ये मिळणार होते. सध्या त्याची काय पोझीशन आहे? आपण या ठिकाणी तुम्हाला सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये फ्लॅटस मिळतील व महानगरपालिकेकडे हॅन्डओव्हर होतील असे म्हटलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

सध्या ते काम प्रोग्रेसमध्ये आहे.

**जयंत पाटील :-**

बिल्डर त्यांच्या मालकीचे फ्लॅट विकण्यासाठी आपली परवानगी घेणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, या ठिकाणी ओ.सी.ला असे म्हटलेले आहे.

**जयंत पाटील :-**

ओ.सी.ला कोणीही विचारत नाही. ओ.सी.ला खूप उशिर होतो. त्याच्यापूर्वी सर्व पझेशन घेउन मोकळे होतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़े.) :-**

आपले सर्व फ्लॅट होत आलेले आहेत. आपण तात्काळ प्राधान्याने जी कार्यवाही करता येईल ती करुया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये फ्लॅटबाबतची माहिती दया आणि त्या बिल्डरने किती फ्लॅट पूर्ण केलेले आहेत किंवा त्या बिल्डरने ८० टक्के, ९० टक्के किंवा १०० टक्के काम पूर्ण केलेले आहे किंवा तो बिल्डर फ्लॅट कधीपर्यंत देणार आहे? याची संपूर्ण माहिती दया. तुम्ही त्याच्याकडे ॲग्रीमेन्ट घेतले असेल तर लिहून दया. तुम्ही त्या बिल्डरला पत्र दया आणि पुढच्या मिटींगला विषय घ्या.

**दिपक खांबित :-**

सी.आर.झेड. ताब्यात घ्यायचे आहे व फ्लॅटचे वाटप कोणाला करायचे आहे? हे समजण्यासाठी हा विषय महासभेमध्ये घेणे योग्य ठरेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़े.) :-**

जोपर्यंत महासभेचा निर्णय होत नाही. तोपर्यंत आपण कार्यवाही करु शकत नाही. जर आज आपल्या ताब्यात फ्लॅट आले तर आपण आज वाटप करु. दुसरा मुददा असा आहे की तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये एक अट ठेवा.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. १५ वर श्री. खतगांवकरसाहेबांचा पाचवा मुददा आहे. ज्या सदनिकांमध्ये सहा परवानग्यांमध्ये निर्णय झालेला आहे, ज्या सदनिका बनविलेल्या आहेत. आपण धोरणात्मक निर्णय घेउन स्थायी समितीची परवानगी घेउ शकतो. स्थायी समिती धोरणात्मक निर्णय घेउ शकते की महासभा धोरणात्मक निर्णय घेउ शकते याचा खुलासा केला तर बरे होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़े.) :-**

त्या सदनिका ऑलरेडी आपल्या ताब्यात आहेत. त्याबाबत इश्यु नाही.

**शशिकांत भोईर :-**

याबाबत स्थायी समिती धोरणात्मक निर्णय घेउ शकते की महासभा धोरणात्मक निर्णय घेउ शकते ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़े.) :-**

तुम्ही कशाच्याबाबतीत बोलत आहात.

**शशिकांत भोईर :-**

मी कोणत्याही बाबतीत बोलत आहे. आपण हा निर्णयसुध्दा योग्य आहे की अयोग्य आहे त्याचा खुलासा केला तर बरे होईल. आपण धोरणात्मक निर्णय घेउन स्थायी समितीची परवानगी घेउ शकतो. म्हणजे आपण स्थायी समिती किंवा महासभा यापैकी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कोणाचीपरवानगी घेउ शकतो ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सांगितलेल्या विषयावर खुलासा करावा. कारण आम्ही त्यावेळेला उपस्थित नव्हतो. सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी विषय कुठपर्यंत झालेला होता ते सांगावे.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, इतिवृत्तांत आपल्या पध्दतीने होते. जरी त्यांनी अनुमोदन दिलेले असले तरी आपण त्यावेळेला उपस्थित होतो.

**मा. सभापती सा़े. :-**

आपण धोरणात्मक निर्णय घेउया.

**रतन पाटील :-**

सदरबाबत असा उददेश होता की मिरा भाईंदर एवढे मोठे शहर आहे. या शहरामध्ये सगळया जुन्या बिल्डिंग आहेत. हया सगळया मोडकळीस आलेल्या आहेत. यासाठी संक्रमण शिबिर होणे आवश्यक होते. महासभेमध्ये संक्रमण शिबिरचा विषय झालेला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़े.) :-**

सभा कामकाजामध्ये जे डिस्कशन होते, जे निर्णय होतात. ते सर्व निर्णय सर्वानुमते होतात आणि डिस्कशन वैयक्तिक होत असते. हे जे डिस्कशन झालेले आहे. ते विषयाच्या अनुषंगाने झालेले आहे. हा कोणत्याही निर्णयाचा भाग नाही. हयाच्यावर कुठलेही इन्टरप्रिटेशन अपेक्षित नाही. आपण हयाच्यामध्ये जी चर्चा केलेली आहे. त्याप्रमाणे ती चर्चा आहे का? एवढेच या ठिकाणी तपासले पाहिजे. त्या चर्चेचा निर्णय अपेक्षित नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला निर्णय विचारत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी मघाशी काय बोललो? ते टाईप केलेले आहे की नाही ही शंका राहू शकते. हयाच्यामध्ये सन्मा. सदस्यांनी मुददा उपस्थित केल्याप्रमाणे त्या ठिकाणी ॲकोमेडेशन डेव्हलपमेन्टमध्ये ज्या परवानग्या दिलेल्या आहेत. आपण त्या सहा फाईल या ठिकाणी तपासलेल्या होत्या. त्या ज्या परवानग्या दिलेल्या आहेत. त्या परवानग्या डी.सी. रुलप्रमाणे देण्याचा निर्णय मा. आयुक्तांना आहेत असे मला या ठिकाणी म्हणायचे होते.

**शशिकांत भोईर :-**

समजा, प्रिन्टिंगमध्ये मिस्टेक झालेली असेल तर तुम्ही ती सुधारित करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

चुक भुल दयावी घ्यावी.

**शशिकांत भोईर :-**

मला या ठिकाणी माझा प्रॉब्लेम विचारायचा आहे. आपण मागच्यावेळेला डॉ. राठोडबाबत मुददा उपस्थित केलेला होता. आता त्यांना अधिकार दिलेले नाहीत. हयाच्यामध्ये तो विषय नाही. परंतु, या ठिकाणी चर्चासत्र चाललेले आहे म्हणून मी विचारतो. आपल्याकडे जे डॉ. राठोड नावाचे अधिकारी उपस्थित झालेले आहेत. मी त्यांच्या विषयी विचारत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी तुम्हाला खुलासा करतो.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी संक्रमण शिबिरचा विषय वेगळा आहे आणि सदनिकांचा विषय वेगळा आहे. तुम्ही सदनिकांच्या विषयाबाबत महासभेमध्ये जे सांगितलेले आहे. त्या सदनिकाबाबत मला असे विचारायचे आहे की मा. मुख्यमंत्र्यांच्या कोटयातून कोणत्या सदनिका दिल्या जातात आणि आपल्या कोटयातून कोणत्या सदनिका दिल्या जातात असे काही नमुद केलेले आहे का? किंवा त्याचे काही परसेन्टेज आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, मी मागच्या बैठकीमध्ये जो मुददा क्लिअर केलेला होता. त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की मा. मुख्यमंत्र्यांचे स्वेच्छा अधिकार मा. मुख्यमंत्र्यांचेच असतात. त्यामध्ये महापालिकेचा रोल येत नाही हे स्पष्ट नमुद केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

परंतु, त्याचे परसेन्टेज किती आहे? ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आज आपण या ठिकाणी अशी कमेन्ट करु शकत नाही. आम्हाला काहीही हक्क पोहोचू शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यासाठी लेखी नियम आहे.

**जयंत पाटील :-**

विकास संचलनालयाला पाच टक्के आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही तुम्हाला नियम तपासुन माहिती देउ.

**रोहिदास पाटील :-**

आपण एवढया सदनिका बनविल्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एवढया सदनिका जातील आणि मा. महासभेकडे एवढया सदनिका जातील याचे काही प्रमाण असेल तर सांगा. आता त्या सदनिका बनलेल्या नाहीत. आपण बनलेल्या सदनिका कोणाला दिलेल्या आहेत किंवा त्याचे प्रयोजन दिलेले नाही किंवा आपल्याला आहेत त्या सदनिका माहिती नाहीत असे जे काही निवेदन करता येईल ते निवेदन करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मा. महासभेच्या डी.सी.रुल अंर्तगत रिझर्वेशनच्या ठिकाणी किंवा विकसित झालेल्या ठिकाणी त्याचे जे काही समायोजन आरक्षणातून घेण्याचे अधिकार आहेत. ते अधिकार आपले आहेत. परंतु, यु.एल.सी. खाली मा. मुख्यमंत्र्यांना ॲक्टनुसार अधिकार आहेत. त्यावर या ठिकाणी चर्चा करणे अपेक्षित नाही असे मला वाटते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आम्हाला माहिती देउ शकत नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही ती माहिती उपलब्ध करुन घेउन तुम्हाला देउ. आम्ही त्याच्यावर चर्चा करणे अपेक्षित नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही कोणत्याही सदनिका घेत नाही. परंतु, आपल्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून एवढया-एवढया सदनिका मिळालेल्या आहेत. आपण हयाची विल्हेवाट लावलेली आहे किंवा आपण हया सदनिका न विचारता कोणाला तरी दिल्या असे काहीतरी आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

महापालिकेला मध्ये ठेवून त्या सदनिका दिल्या जात नाहीत. शासन स्तरावर त्या इन्डिपेन्डन्टली निर्णय घेतले जातात.

**रोहिदास पाटील :-**

आता जे ४१ आले आहेत ते कुठल्या?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

आपण ह्या दिलेल्या परवानग्या आहेत. महापालिकेने दिलेल्या परवानग्या आहेत. आपण आपल्या स्तरावर त्या सदनिका देणार आहोत. तिथे रिझर्वेशन होते. आपण त्या ठिकाणी ॲकोमडेशनप्रमाणे डेव्हलपमेन्ट करायला परवानगी दिलेली आहे. आपल्याकडे डी.सी. रुलप्रमाणे त्याचे काही परसेन्टेज घेण्याचे अधिकार आहेत. त्या अंर्तगत हया परवानग्या दिलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मी तेच विचारतो आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

आम्ही तुम्हाला याबाबत माहिती देउ. पुढच्या सभेत सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे ते अहवाल देतील असे आता त्यांनी तेच निवेदन केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आज विचारलेले नाही. आम्ही त्यांना यापूर्वीसुध्दा विचारलेले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

ते कमी पडलेले आहेत. त्यामुळे तुम्हाला जस्टिफाय करायला पाहिजे. ते कमी पडलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आता तीन महिने व्हायला आलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

पुढच्या सभेत नगररचना विभागाकडून माहिती घेउन वस्तुस्थितीची माहिती दिली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, डॉ. राठोड हयांना आरोग्य व वैद्यकिय अधिकारी आहेत. परंतु, आजपर्यंत त्यांना त्यांचा चार्ज दिलेला आहे की नाही आम्हाला हे माहिती नाही. त्यांना त्यांचे अधिकार दयायला पाहिजेत. आपण ठेका पध्दतीने डॉ. पडवळसाहेबांना अधिकार दिलेले होते. आता डॉ. राठोड यांच्याकडे किती अधिकार आहेत? ते सांगा. आपल्याकडे दुसरे एस.आय. आहेत. त्यांना अनुभव आहे. त्यांना इतर अधिका-यांपेक्षा दांडगा अनुभव आहे. कारण ते ब-याच ठिकाणी प्रतिनियुक्तीवर फिरलेले होते. आपल्याकडे खुप मोठया प्रमाणावर आजार होतात. कधी डेंग्यु होतो, कधी लेप्टोस्पायरसीस होतो, कधी चिकुनगुनिया होतो असे बरेच आजार होतात. सध्या आपल्या नगरसेविकासुध्दा आजारी आहेत. काल मीसुध्दा आजारी होतो. त्यामुळे आतापर्यंत मा. आयुक्तांनी डॉ. राठोड यांना त्यांचे अधिकार दिलेले नाहीत. आपण त्याबाबत खुलासा केला तर बरे होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टराचे कर्तव्य आहे. कारण डॉक्टर कधी कोण आजारी आहे हे बघून वेळेवर मेडिसीन देउ शकतात.

**शशिकांत भोईर :-**

डॉक्टरांना त्यांचा अधिकार दिल्याशिवाय ते काम करु शकत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

डॉ. राठोड यांना निश्चितपणे त्यांचे अधिकार दिले जातील. अधिकार न देता कोणत्याही अधिका-याला ठेवता येणार नाही. उलट त्यांची जी सेवा आहे. ती त्यांना दिली जाईल.

**जयंत पाटील :-**

याचा अर्थ आपण त्यांना अधिकार दिलेले नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

आपण डॉ. राठोड यांना अधिकार दिलेले नाहीत असा याचा अर्थ होतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

त्यांची फाईल प्रस्तावित होउ दया.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना मानधन देणार आहोत.

**शशिकांत भोईर :-**

आपण डॉ. राठोड यांना मानधन देणार आणि अधिकार देणार नाही. मग आपण त्यांना पालिकेमध्ये ठेवून काय फायदा आहे? असा त्याचा अर्थ झाला. आता या ठिकाणी डॉक्टर आलेले आहेत. आपण त्यांना मानधन देणार, गाडी देणार, केबीन देणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी एक चुक होत आहे. आपण डॉ. राठोड यांना मानधन देत नाही. आपण डॉ. राठोड यांना वेतन देत आहोत.

**शशिकांत भोईर :-**

माझे म्हणणे वेतन असेच आहे. जर त्या डॉक्टरांचा आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये वापर होत नसेल तर आपण त्यांना वेतन देउन काय फायदा आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

ही प्रशासकीय बाब आहे. त्या अनुषंगाने आवश्यक ती संचिका तयार झालेली आहे. आज किंवा उद्या त्यांच्याकडे त्याबाबत निर्णय घेतले जातील.

**शशिकांत भोईर :-**

त्याबददल काही आत्मीयता आहे का?

**जयंत पाटील :-**

त्यासंबंधी प्रशासनाला काही आकस आहे का?

**शशिकांत भोईर :-**

आपण डॉ. राठोड यांना चार्ज दिला तर त्यांनी मिरा भाईंदर शहरामध्ये काहीतरी चांगले कार्य करण्याची योजना आखलेली आहे असे आम्हाला दिसले पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही त्याच्यावर निर्णय घेउ.

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा यांनी प्रकरण क्र. १२२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरो :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

शासनाने महापालिकेच्या बालवाडयांकरिता शिक्षकांची पदे मंजुर केलेली आहेत आणि तसे आदेश निर्गमित केलेले आहेत. पदे भरण्याची कार्यवाही नियमानुसार करावी असे त्याच्यामध्ये एक वाक्य टाकलेले आहे. त्यामुळे आम्हाला हयांना सामावुन घेण्यासाठी प्रशासकिय लेव्हलवर अडचण आलेली होती. आम्ही शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी ही क्वेरी केलेली आहे. आपल्याला ते मार्गदर्शन हया आठवडयामध्ये येण्याची अपेक्षा आहे. आम्ही ते मार्गदर्शन आल्यानंतर त्यांना सामावून घेउ.

**शशिकांत भोईर :-**

आपण ज्यावेळेला मंजुरी दिली. त्यावेळेला शासन स्तरावर निर्णय झाला. त्यावेळेला संबंधित उपस्थित होते का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

संबंधितांच्या नावाची ऑर्डर निघालेली नाही. आपल्याला ती विशेष बाब म्हणून आपण मान्यता घेण्यासाठी फेरप्रस्ताव सादर केलेला आहे. आपल्याला ती मान्यता मिळून जाईल असे आपण गृहित धरुया.

**जयंत पाटील :-**

आपण नावाच्या ऑर्डरबाबत बोलता. मग आपल्याकडे २७ किंवा २८ बालवाडी शिक्षिका आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याकडे जेवढया बालवाडी शिक्षिका असतील आपण तेवढयांची नांवे घ्यायची आहेत.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे २८ बालवाडी शिक्षिका असतील तर आपल्याला तेवढयांची नांवे घेण्याची काय गरज आहे?

**रोहिदास पाटील :-**

त्या शिक्षिका आता कार्यरत आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आता आपल्याकडे ज्या शिक्षिका नेमलेल्या आहेत. त्याच्यामध्ये रोस्टर नाही. आता नवीन पदे भरताना नियमानुसार भरावयाची म्हटल्यानंतर काही पदे रोस्टरप्रमाणे अनुसुचित जाती, एस.टी., ओ.बी.सी. ची असतील. त्यामुळे संख्या कमी होईल.

**जयंत पाटील :-**

त्या शिक्षिकांची जी वेतनवाढ होईल. ती वेतनवाढ महापालिकेचा जो ठराव झालेला आहे. तेव्हापासून देणार आहात का? जर आपण त्यांना पदनिर्मितीने आस्थापनेवर घ्यायचे असेल तर तुम्ही त्यांना तेव्हापासून वेतनवाढ देणार आहात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

ज्यावेळेला पदे स्थापन होतील. आपण त्यांना तेव्हापासून वेतनवाढ देणार आहोत.

**जयंत पाटील :-**

जसे श्रीम. रत्नप्रभा मोघे यांचे मॅटर झाले. आपण तसेच करणार आहोत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्या शिक्षिकांनी मागणी केल्यानंतर आपल्याकडे तो विषय येईल. आज आपण चर्चा करु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

श्रीम. रत्नप्रभा मोघे बाईंचे काय झाले? त्यांनी ॲफिडयुट दिले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्यांनी ॲफिडयुट दिल्यानंतर त्यांच्यावर कार्यवाही होईल.

**जयंत पाटील :-**

आपल्याला तोपर्यंत काहीही करता येणार नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याला ॲफिडयुट देईपर्यंत काहीही करता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपण ठराव करून टाकला आहे त्यांच्या बाजुने.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण ते करुन घेउया. त्याच्यावर कार्यवाही झाल्यानंतर आम्ही तुम्हाला खुलासा देतो.

**जयंत पाटील :-**

याचा अर्थ अजुनपर्यंत कार्यवाही झालेली नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मध्यंतरी सुटटया असल्यामुळे व आम्ही बाहेर गेल्यामुळे आपण कार्यवाही करु शकलो नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही हया विषयावर फेरविचार करुन पुढच्या सभेला त्या शिक्षिकांची नांवे दया.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही दुसरे प्रकरण सुरु करण्यापूर्वी मी दोन गोष्टींवर तुमचे लक्ष वेधु इच्छितो की आपल्याला खरोखर आरोग्याच्या दृष्टिने या ठिकाणी चर्चा करणे आवश्यक आहे. आपण चर्चा केली आणि उठून गेलो, परत आलो, परत चर्चा सुरु झाली. परंतु, तो विषय बाकी राहिला की आता शहरातील पाउस संपलेला आहे. पाउस संपल्यानंतर सांडपाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टिने महापालिकेचे नक्की काय कर्तव्य आहे? काय प्रयत्न चाललेले आहेत? कारण आता पाउस नाही. सगळी डबकी भरलेली आहेत. डबक्याचे पाणी निघणार नाही. डबक्यात पाणी कुजत राहणार आहे. दुर्गंधी सुटत राहणार आहे. त्याच्यावर डास तयार होणार आहेत आणि पुन्हा रोगराई होणार आहे. त्यासाठी युध्दपातळीवर हया महापालिकेचे काय काम चालू आहे? हयाचे निवेदन होणे आवश्यक आहे. आता जसे कनाकियामध्ये गेलात तर पाउस नाही तरीसुध्दा सगळे मागे पडलेले आहे. ते पाणी कुठेच जात नाही. पावसाळयात पावसाचे पाणी निघुन गेलेले आहे. हे पाणी कुठे जाईल? कारण त्या पाण्याला प्रवाह नाही. तुम्ही त्या पाण्याला प्रवाह करण्यासाठी उप-आयुक्त किंवा त्या डिपार्टमेन्टला तशा सुचना दिलेल्या आहेत का? त्यांना काही अधिकार दिलेले आहेत का? कारण त्यांच्याकडे माणसे नाहीत. आम्ही कालच्या प्रभाग समितीमध्ये त्याबाबत अर्धा तास चर्चा केलेली होती की जैननगरच्या मागे काही कारण नसताना मध्ये दलदल तयार झालेली आहे. जी रामबाणाची झाडे तयार झालेली आहेत. त्या ठिकाणी एक नाला केला तर एक महिन्यामध्ये ८-१० एकर प्लॉट खाली होईल. म्हणजे आपले काम कोणीही करित नाही, कोणी कोणाला अधिकार दिलेल नाहीत. पावसाच्या पाण्याचा निचरा वेगळा आहे आणि सांडपाण्याचा निचरा वेगळा आहे. श्री. खतगांवकरसाहेब, मी तुम्हाला माहितीसाठी सांगतो की आम्ही आमची सगळी जमीन उन्हाळा गेला ऑक्टोबर महिना गेला नोव्हेंबर महिन्यामध्ये सगळी जमीन २-२ इंच फाटत होती. ज्याच्यामध्ये पाणी घुसत होते. आज तिथे पाणी भरून आहे. मग ते फाटणार कसे? जर तुम्ही एका महिन्यामध्ये पाणी काढाल तर तुम्हाला मच्छर मारायला नको, तुम्हाला गवत काढायला नको. हयांना काहीतरी सिजनल ॲथोरिटी दयायला पाहिजे. हे सिजनल काम आहे. जर हयांनी एक महिना पाण्याचा निचरा केला तर प्रत्येक भाग सांडपाण्यापासून, दलदलीपासून मुक्त होईल. ते कच्चे गटार आहे. ते पक्के गटार नाही. श्री. खांबितसाहेब, काय म्हणतात? ते बघा. पाणी बरोबर आहे का? ते काम कोणाकडे आहे? हयाची सभागृहाला माहिती होउ दया.

**दिपक खांबित :-**

हे आरोग्य विभागाचे काम आहे.

**रोहिदास पाटील :-**

आरोग्य विभागाचे काम असेल तर श्री. अजिज शेखसाहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. आरोग्याचे काम कोणाकडे आहे? ते त्यांना विचारा. ज्यांच्याकडे हे काम आहे त्यांच्याकडे यंत्रणा आहे का? ती लोक काम करतात की करत नाहीत. जर ती लोक काम करत नसतील तर दुस-यांकडे ते काम दया.

**दिपक खांबित :-**

या ठिकाणी असा विषय आहे की जी मोठी-मोठी डबकी साचलेली आहेत. तेथील पाणी प्रत्यक्ष काढायचे आहे. जर आपल्याकडे मशिनरी उपलब्ध असतील तर ते पाणी मशिनरीद्वारे काढले जाईल.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही विषय बदलु नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

पाणी पडल्यानंतर पाण्याचा निचरा होतो आणि पाणी निघुन जाते.

**रोहिदास पाटील :-**

पाउस पडतो तसे पाणी निघुन जाते. तुम्ही जैन नगरचे पाणी काढले तर तुमचे चार फुट पाणी समुद्रात जाणार आहे हे नक्की झालेले आहे. तुम्ही चार फुट पाणी काढले तर सगळे पाणी निघुन जाईल आणि ते पाणी जमिनीत खेचले जाईल, जमीन सुकी होईल, जमिनीची दलदल संपेल, गवत मरेल आणि मच्छर जाईल. आपल्याला त्यासाठी औषध फवारणी करण्याची काहीही गरज नाही. रोगराईसुध्दा थांबेल. आपण उगीच करोडो रुपये खर्च करतो. जे मुळ काम आहे ते प्रथम करा.

**दिपक खांबित :-**

ते पावसाचे पाणी आहे की सांडपाणी आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता ते सांडपाणी आहे. पावसाचे पाणी हयाच्या-त्याच्या दारातून बाहेर गेलेले आहे तो विषय संपलेला आहे. आता नक्कीच पाउस नाही. आता पाउस नाही आणि नालासुध्दा साफ नाही. कनाकियामध्ये जो नाला आहे. तो नालासुध्दा साफ नाही.

**दिपक खांबित :-**

असे जे स्पॉट असतील त्या ठिकाणी पाण्याचा निचरा होउ शकत नाही. तिथे जे.सी.बी. मशिनचे टेन्डर आहे.

**मा. सभापती साो. :-**

जे.सी.बी. चे टेन्डर वर्षभर आहे. मग जे.सी.बी. लावायला सांगा.

**रोहिदास पाटील :-**

जे.सी.बी. चे टेन्डर दिवसातून एक वेळा असेल तर तुम्ही ते दिवसातून चार वेळा करा. जर त्यांनी पंधरा दिवस काम केले तर आपल्याला त्याचा रिझल्ट दिसला पाहिजे. नाहीतर आपण वर्षभर काम करु, पुन्हा पावसाळा येईल आणि ते गटार साफ होणार नाही. तुम्ही त्यांना तुमच्या नियमानुसार तसे सांगा. परंतु, कुठलेही काम बेकायदेशीर करु नका.

**रोहिदास पाटील :-**

एकटा माणुस काय करणार? एकटा माणूस काहीही करु शकत नाही. मग मुर्ध्याची खाडी असु दे, राईची खाडी असु दे. आम्ही आमच्या भागातील सांगतो.

**मा. सभापती साो. :-**

श्री. खतगांवकरसाहेब, हयाच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी खुलासा केला. माझ्या माहितीप्रमाणे त्याबाबत मा. आयुक्तांना कलम १६२ व कलम १६३ प्रमाणे अधिकार आहेत. त्याप्रमाणे ते ताबडतोब कार्यवाही करु शकतात. या ठिकाणी स्पष्ट लिहिलेले आहे. सचिवांनी ते वाचावे.

**मा. सभापती साो. :-**

आपण तसे आदेश दिलेले आहेत. संबंधित अधिकारी ताबडतोब कार्यवाही करतील.

**शशिकांत भोईर :-**

संबंधित अधिकारी कार्यवाही करतील. परंतु, पुढच्या मिटींगला तो विषय घ्यावा लागेल. मा. आयुक्तसाहेब कलम १६२ व कलम १६३ प्रमाणे कार्यवाही करु शकतात. त्यांना अधिकार आहेत. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी निदर्शनास आणले तेव्हा आमची प्रभाग कार्यालयात मिटींग चालू होती. आम्ही त्यावेळेलासुध्दा त्यांना कलम १६२ व कलम १६३ सांगितले होते वा मा. आयुक्तसाहेबांना अधिकार असताना मा. आयुक्तसाहेबांनी ताबडतोब कार्यवाही करायला पाहिजे. परंतु, त्यावेळेला श्री. अजिज शेखसाहेब जागेवर नव्हते, श्री. कांबळेसाहेब सुटटीवर गेलेले होते. त्यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करुन कार्यवाही करावी. भोगवटाधारकाकडून काढला की नाले पक्क्या स्वरुपाचे झाले असे काहीही नसते. पाण्याचा निचरा कसा होईल ते पाहणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

पाण्याचा निचरा होउ दया. सहा फुट रुंद व सहा फुट खोल असा नाला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

महापालिकेचे जे जे.सी.बी. ठेका पध्दतीवर आहेत. त्याबाबत संबंधित सदस्यांनी सुचना दिल्याप्रमाणे त्यांच्या मदतीने किंवा आणखी जास्तीचे लागत असतील तर त्यांचा वापर करुन आरोग्य विभागाकडून असे निचरा होणारे जे प्वॉईन्टस होते. ते टेम्परी व्हॅकेट करुन घ्यावेत.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जिथे-जिथे पाणी तुंबत असेल ते सगळे साफ करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

शहरातील जी आवश्यक स्थळे आहेत. उदा. गोल्डन नेस्ट, मुर्धा खाडी, राई खाडी, कनाकिया, जैन नगर ते साफ होणे आवश्यक आहे.

**दिपक खांबित :-**

आपण ते सर्व प्रत्येक वर्षी साफ करित असतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण प्रत्येक वर्षी साफ करतो. परंतु, ते काम आणखी प्राधान्याने करण्याच्या सुचना दिल्या जातील.

**शशिकांत भोईर :-**

दुसरी गोष्ट म्हणजे मी अनधिकृत बांधकामाबाबत चर्चा केलेली होती. त्याचे काय झाले? त्याचे संबंधित अधिकारी आलेले आहेत की नाहीत.

**मा. सभापती साो. :-**

सध्या अनधिकृत बांधकामाविषयीचे अधिकारी आलेले नाहीत. त्यामुळे आपण अधिकारी आल्यावर चर्चा करुया. आपण हा विषय नंतर घेउया.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापतीसाहब, जैन मंदिर के आगे चाल बनती जा रही है। उसका कुछ परमिशन है या नही। सिर्फ चाल ठोकते जा रहे है। मिरा भाईंदरमे झोपडपटटी कम होती है तो चाल बनाना चालू हो गया है। इसका कुछ परमिशन है या नही या फिर ऐसेही चाल हो रही है। ऐसेही ठोकाठोक हो रही है और बांधकाम विभागवाला देखता है या नही इसका कुछ पता नही या अतिक्रमणवाले देखते है या नही उसका कुछ पताही नही है। हमारा 'जी' झोनमेभी काम चालू होता है। उसके लिये कुछभी परमिशन नही है। मंदिरके बाजुमे आर.एम.पी. पार्कमे खुली पडी हुई जगह थी उसमे गार्डन बनाना चाहिये था। उसको कम्पाउन्ड मारके उसके उपर बांधकाम शुरु किया था। गये हप्तेमे कमिशनरसाहबको बोलके वह निकाला। ऐसेही सब चलता रहेगा क्या? हम लोगोंको बोलनेकी जरुरत है क्या? जैन नगरमे बहुत सारी अनधिकृत चाल बनी है। उसको परमिशन है क्या? उसका क्या करेंगे? सब ऐसेही रामराज्य चलता रहेगा या उसके उपर कार्यवाही होगी वह बताईये। मैने कार्यवाही करनेका आदेश दिया है। मा. आयुक्तसाहब, कार्यवाही करेंगे क्या? इसका पहले खुलासा किजिये।

**मा. सभापती साो. :-**

कार्यवाही करेंगे - आदेश दिया है।

**जयंत पाटील :-**

आपल्याला हयाच्यावर ॲक्शन घेण्यासाठी काही अडचण आहे का? की कोणाचा दबाव आहे ते सांगा.

**हंसुकुमार पांडे :-**

साहब, लास्ट टाईम सर्व्हिस रोड के बारेमे चर्चा हुई थी। श्री. स्टिवनसाहबने कार्यवाही करेंगे ऐसे कहा था। लेकिन उसके बारेमे कुछ होता नही है। उधर सर्व्हिस रोडतक ऐसेही बिल्डिंग बन गई है। अनधिकृत बांधकाम के बारेमे कुछभी कार्यवाही नही होती है।

**रोहिदास पाटील :-**

आपण हया विषयावर बोलत नाही. म्हणून या ठिकाणी चर्चा होते आणि कार्यवाही होत नाही.

**रमेशचंद्र जैन :-**

मगर काम पुरा हो गया है।

**हंसुकुमार पांडे :-**

सब कन्स्ट्रक्शन पुरा हो गया है । लेकिन जिधर अच्छी जगह है उधर कचरापट्टी मत करो ।

**रोहिदास पाटील :-**

मै सभागृहमे इन सबको इस सर्व्हिस रोडके मुददे के बारेमे चर्चा करने के लिये मा. आयुक्तसाहब को सन्मानसे बुलायेंगे। उनका क्या रोल है? वह ॲक्शन नही लेंगे क्या? ॲक्शन नही लेनी है तो चर्चा क्यो करेंगे। हम लोग हमेशा चर्चा करके छोड देते है। मगर कार्यवाही नही होती है।

**रोहिदास पाटील :-**

स्पष्टपणे बेकायदेशीर काम चालते. त्याच्यावर कार्यवाही होणार नाही. मग या सभागृहामध्ये चर्चा करण्यात काहीही अर्थ नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

नवघर रोडला श्रीराम ज्वेलर्स आहे. त्याच्या पाठीमागे तीन मजल्याची बिल्डिंग बनलेली आहे. त्याच्यावर काहीही कार्यवाही होत नाही.

**मा. सभापती सो. :-**

मी ही मिटींग संपल्यानंतर संबंधित अधिका-यांना बोलावून त्यांच्याबरोबर मिटींग घेतो आणि लगेच कार्यवाही करुन घेतो. तेथील जी-जी अनधिकृत कामे आहेत. मी ती सगळी अनधिकृत कामे बंद करेन.

**प्रकरण क्र. १२२ :-**

दि. २७/०७/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १२५ :-**

दि. २७/०७/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२३ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आमची भुमिका त्या दिवशी मांडलेली आहे. त्याच्यामध्ये काही बदल झाला तर सांगा. नाहीतर आमचा त्याला विरोध आहे हे स्पष्ट आहे. डॉ. रमेश जैन आणि मी आमच्या दोघांच्यावतीने निवेदन करतो आणि विरोध नोंदवतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

मी तुम्हाला खुलासा करतो की महापालिकेच्या उत्पन्नाचा सोर्स वाढावा. म्हणून महापालिकेने मार्गस्थ दाखला अधिनियमाच्या तरतुदीनुसार लागू करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने आपल्या शहरामध्ये जेवढे मुख्य रस्ते, राष्ट्रिय महामार्ग व इतर रस्ते क्रॉस होतात. त्याचे इन्कमिंग व आउट गोईन्ग म्हणजे येण्याचे आणि बाहेर जाणा-या जागेच्या ठिकाणी हया चौक्या कायम करुन महापालिकेच्या मान्यतेच्या दराप्रमाणे त्या ठिकाणी मार्गस्थ दाखला नियमानुसार वसुल केला जाणार आहे. त्यासाठी जी स्टेशनरी ढाचा छपाई करावयाची आहे. पावती पुस्तके, रजिस्टर त्याच्या खर्चाला व त्याला मान्यता घेण्यासाठी हा प्रस्ताव आपल्यासमोर आणलेला आहे. महापालिकेने मान्यता दिल्यानंतर मला हयाच्यावर पुन्हा चर्चा होणे नियमानुसार अपेक्षित वाटत नाही. याबाबतचे धोरण महासभेमध्ये ऑलरेडी निश्चित झालेले आहे. माझी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना विनंती आहे की या ठिकाणी पुन्हा धोरणाचा विषय येत नाही. तुमचा त्या ठिकाणी ऑलरेडी विषय झालेला आहे. महासभेत निर्णय झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही महासभेला आणि सभासदांना अंधारात ठेवून हा विषय आणता अशी बाब आम्ही महासभेतसुध्दा तुमच्या लक्षात आणलेली होती. माझे जेवढे निवेदन आहे. तुम्ही तेवढे निवेदन नोंदवुन घ्या. जेव्हा तुम्हाला स्पष्ट माहिती नव्हती. आम्ही तुम्हाला त्यावेळेला बोलावून घेतले आणि या ठिकाणी निवेदन झाले की तुम्हाला हायवेबाबत अधिका-यांनी स्पष्ट पत्र दिलेले होते. तुम्हाला त्या पत्रामध्ये हायवेच्या हददीमध्ये कुठेही कोणत्याही रु. १ /- ची वसुली करता येत नाही असे नमुद केलेले होते. मी काल हे निवेदन मा. आयुक्तसाहेबांसमोर केलेले होते. मा. आयुक्तसाहेबांनी तपासणी करा आणि नंतर निर्णय घ्या असे सांगितले होते. तुम्ही सदस्यांवर निर्णय लादु नका अशी माझी विनंती आहे. जर सभागृह असे निर्णय घेत असेल तर भारतीय जनता पार्टीचे पक्षीय धोरण होते. आमच्या पक्षाचे धोरण होते. तुम्हाला कोणाला वाईट वाटु देण्याचे कारण नाही. मी स्वतः म्हणजे श्री. रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य रमेशचंद्र जैन या ठरावाला विरोध करणार आहेत. कारण हयाच्यामध्ये तुमची कुठलीही पुर्तता नाही. एकतर आपला सर्व्हिस रोड वर्सोवा ब्रीजपासून दहिसर चेकनाक्यापर्यंत असता तर वेगळी गोष्ट होती. तुम्ही निघालेला ट्रक तुमच्या कोणत्या अधिकारात थांबवु शकता ते सांगा. तुम्हाला हायवेवरिल ट्रक कुठेही थांबविण्याचा अधिकार नाही. मुळात तो ट्रक हायवेवरुन जाणार आहे. तुम्ही ट्रकला कोणत्या अधिकारात बाजूला घ्या असे डायरेक्शन देणार आहात ते सांगा. ट्रक बाजुला घेत असताना कोणते स्पॉट आहेत. मी आधीचे प्रोसीडिंग वाचलेले आहे. तुम्ही त्यावेळेला निवेदन केलेले आहे की हायवेच्या अधिका-यांना बरोबर घेउन मी जागेची पाहणी केलेली आहे. परंतु, तुम्ही कालच्या बैठकीमध्ये निवेदन करता की तुम्हाला हायवेच्या अधिका-यांनी तुम्ही कोणताही टोल घेउ शकत नाही असे स्पष्ट लेखी दिलेले आहे. तुम्ही आम्हाला कशाला अडचणीत आणता? जर प्रशासनाची होणारे कामकाज नियमात आहे

अशी हयाच्यावर पूर्ण खात्री असेल तर माझी तुम्हाला विनंती आहे की आज स्थायी समितीचा ठराव न घेता तुम्ही त्या अधिकारामध्ये खर्च करुन अवलोकनार्थ पाठवु शकता. तुम्ही सदस्यांना कशासाठी सतवता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

प्रशासनाला या खर्चाला मंजुरी दिली तरी नियमबाहय काम करता येत नाही.

**जयंत पाटील :-**

पावत्या छापण्यासाठी आर्थिक मंजुरी आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला ज्या गोष्टीचा अधिकार नाही. त्या पावत्या छापण्यासाठी आमची संमती का घेता? तुम्हीच पावत्या छापा. तुम्हाला तुमच्या अधिकाराची खात्री आहे. तुम्ही तुमच्या अधिकारात पावती छापा. तुम्ही त्या पावत्या विकु शकत नाहीत, देउ शकत नाहीत. तर त्या हददीमध्ये उभे राहून, त्या खर्चाला आमची मान्यता का घेता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

मी तुम्हाला हे आश्वासित करु इच्छितो की महापालिका नियमबाह्य काहीही करणार नाही. पावत्या छापायला परवानगी दिली म्हणजे आम्ही काही नियमबाहय करणार आहोत असा त्याचा अर्थ कदापि काढू नका. जी वसुली केली जाईल ती नियमानुसार केली जाईल. आपल्याला प्राप्त अधिकारात वसुली केली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही ज्या दिवशी हया स्थायी समिती सभागृहामध्ये पाउल ठेवल्यापासून माझे स्पष्ट निवेदन आहे की जे चांगले आहे. आम्ही त्याला पूर्णपणे सहकार्य करु आणि जे नियमबाहय आहे. आम्ही त्याला कर्तव्य म्हणून विरोध करणार आहोत. तुम्ही या ठरावाला आमचा विरोध नोंदवून ठराव करा. या ठिकाणी दोन सन्मा. सदस्यांचा विरोध नोंदवून हा ठराव घ्या.

**मा. सभापती सा़ो. :-**

तशी नोंद करून घ्या. आपण ठराव पास केलेला आहे.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १२३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांचा विरोध नोंदवून घेण्यापेक्षा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांची त्याबाबत सुचना घ्या.

**रोहिदास पाटील :-**

माझा विरोध प्रोसिडिंगमध्ये आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही विरोधासाठी विरोध करु नका.

**मा. सभापती सा़ो. :-**

तुम्ही या ठिकाणी विरोध कशाला करता?

**जयंत पाटील :-**

तुम्ही नियमाच्या अधीन राहून असे बोला.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही नियमाच्या अधीन राहून असे बोला.

**जेन्वी आल्मेडा :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही ज्येष्ठ नगरसेवक आहात. तुम्ही या सुचना म्हणून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

जर नियमाला अनुसरुन असेल तर मान्यता दया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, जर आर्थिक फायदा होत असेल आणि इन्कम वाढत असेल तर थोडेसे नियमबाहय झाले तर काहीही हरकत नाही.

**जयंत पाटील :-**

परंतु, हे नियमबाहय करायला तयार नाहीत.

**प्रकरण क्र. १२३ :-**

मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) पावती पुस्तके विविध स्टेशनरी छपाई करणे बाबत. (दि. ११/१०/२००६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ११०)

**ठराव क्र. १२६ :-**

मिरा भाईंदर शहराच्या हद्दीतून जकात पात्र माल घेवून त्वरीत निर्गत होणाऱ्या वाहनांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४७ नुसार मार्गस्थ दाखला फी (एस्कॉटर्) आकारणी करणे कामी मा. महासभा दि. २०/३/२००६ ठराव क्र. ९७ ने पारीत करुन मंजूरी दिलेली आहे.

सदर संदर्भात मार्गस्थ दाखला फी वसूली कामी खालील स्टेशनरी छपाई करणे आवश्यक आहे.

१) मार्गस्थ दाखला फी पावती नमुना नं. १७(७)

| **अ.क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **आकारण्यात येणारे दर** |
|---|---|---|
| १ | अ - तीन चाकी टेम्पो | १०/- रूपये |
| | ब - चार चाकी टेम्पो | २५/- रूपये |
| | क - लॉरी, ट्रक | ८०/- रुपये |
| | ड - कंटेनर | १००/- रुपये |
| २ | माल संरक्षकाशिवाय निर्गमन नाक्यापर्यंत लेखी परवानगीसाठी प्रतिज्ञापन नि-अजर्. नमुना - २(नियम १३) नुसार | |
| ३ | संकीर्ण जमा रक्कमांची वसुली नोंद वही. नमुना नं. ७८ (नियम १०३ (२),११०(२), ११६(२)) | |
| ४ | जकात/कराधन अधिक्षकाची वसुली नोंद वही. नमुना नं.३६ नियम ७० (२) | |
| ५ | मार्गस्थ फी भरणा रजिस्टर | |
| ६ | प्रत्येक एस्कॉर्ट नाक्यावर तसेच नाक्याच्या आगमन ठिकाणी लागणारे लोखंडी बोर्ड (४ फुट × २$^{1}/_{2}$फुट) | |

तरी वरील सर्व स्टेशनरी तसेच बोर्ड नमुन्यानुसार व वेळोवेळी छपाई करणे करीता मा. स्थायी समिती सभा देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२४ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

महापालिकेच्या क्षेत्रामध्ये छोटे-मोठे उद्योगधंदे आहेत. या उद्योगधंदयांमध्ये बाहेरुन जास्त प्रमाणात लेबर जॉब म्हणून बरेच काम मिरा भाईंदरमध्ये येते. अशा लेबर जॉबमध्ये काम येत असताना महापालिका त्याच्यावर कर आकारणी करते. या ठिकाणी पान क्र. १९ वर पाचव्या पॅरेग्राफमध्ये लिहिलेले आहे. त्याच्यावर असे लिहिलेले आहे की जर त्याच्यामध्ये फेरबदल झाला तर आपण त्याच्यावर जकात आकारु शकतो. परंतु, फेरबदलासाठी म्हणजे आपल्या मिरा भाईंदर हददीमध्ये काम करण्यासाठी तो लेबर जॉब असतो. आपल्याला समोरच्या पार्टीकडून चलन येते. ज्या पध्दतीने त्याचे ड्रॉईंग असते. आपण त्या ड्रॉईंगप्रमाणे काम करुन पुन्हा त्या पार्टीकडे जातो. त्याच्यावर अशा पध्दतीने करायला पाहिजे. आपण या ठिकाणी काम आणून त्या पार्टीकडे परत जायला पाहिजे. आपण त्याच्यावर जकात लावून आपल्याला लेबर जॉबला काय मिळणार आहे? जे छोटे-मोठे काम करणारे किंवा उद्योगधंदे करणारे आहेत. त्यांना त्याच्यामध्ये काय मिळणार आहे? या ठिकाणी तो फेरफार व्हायला पाहिजे. मी हा जॉब कुठेतरी बाहेरून बनविला, तो ज्या कंपनीतून आला, आपण पुन्हा तो त्याच कंपनीमध्ये पाठवतो. त्याच्यामध्ये कुठेतरी फेरफार झाला पाहिजे. म्हणजे त्याला जकात भरायची नाही किंवा कोणी नॉमिनल करदाता असेल तर मी त्याबाबत बोलत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

तुम्ही कोणीही प्रत्येकाने हे चॅपटर आणलेले नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे त्याच्यामध्ये एक प्रोसेसिंगचे चॅपटर आहे. तुम्ही ते चॅपटर वाचलेले नाही. आपल्याला हयाला मान्यता दयायची आहे. तुमची जी अडचण आहे. तुम्ही ती अडचण बघितली तर दूर होउन जाईल.

**रतन पाटील :-**

तुम्ही ते चॅपटर वाचा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

हे जे स्थायी आदेश तयार केलेले आहेत. त्या स्थायी आदेशामध्ये तुम्ही जी अपेक्षा करता ती तरतुद आहे असे मला म्हणायचे आहे. आम्ही त्याच्यामध्ये आपल्याला तशी फॅसिलिटी देण्याचे अधिकार राहतील अशी बाब ऑलरेडी नमुद केलेली आहे.

**रतन पाटील :-**

ही बाब कुठल्या चॅपटरमध्ये आहे ते सांगा.

**शशिकांत भोईर :-**

मी संपूर्ण वाचलेले आहे. त्याच्यामध्ये तसे नमुद केलेले नाही.

**रतन पाटील :-**

तसे नमु द केलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी पैसे भरायला डिपॉझीट भरावे लागेल.

**रतन पाटील :-**

त्यांना डिपॉझीट भरावे लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

प्रत्येक वेळेला तेवढे डिपॉझीट ठेवावे लागेल.

**मा. सभापती साो. :-**

डिपॉझीट ठेवून रिफन्डेबल होईल. आपल्याला डिपॉझीट ठेवावेच लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण ती तरतुद ठेवलेली आहे.

**मा. सभापती साो. :-**

आपण ती तरतुद ठेवलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण ठेका पध्दतीने महापालिकेकडे डिपॉझीट ठेवायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी जॉब वर्कसाठी आयात केलेला माल म्हणजे या ठिकाणी जॉब वर्क असे म्हटलेले आहे. आपल्याकडे कच्चे लोखंड आले तर त्याच्यावर प्रक्रियाद्वारे मुळ मालाच्या गुणवत्तेत बदल होउन त्याच्यामध्ये चेन्ज झालेले आहे. त्या लोखंडाचे काही चेन्जेस करुन जॉब बनविला जातो. मुळ मालापासून पूर्णपणे नवीन वस्तु तयार झाल्यास किंवा उत्पादन प्रक्रिया झाल्यास त्याच्यावर प्रचलित दराने जकात आकारणी करण्यात येईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

जर त्याचा फॉर्म बदल झाला तर तसे करायचे आहे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी फॉर्म बदलचेसुध्दा नमुद केलेले आहे. आम्हीसुध्दा तेच बोलतो.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हे कशासाठी देणार आहात? तुम्ही तुमच्याकडे रंग लावण्यासाठी माल आणला तर तुम्ही रंग लावून पुन्हा माल परत देणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

रंग लावण्यासाठी फॉर्म बदलला असे होत नाही. एक अँगेट तर त्याच्यावर प्रोसेसिंग करुन वेगळेच मटेरियल तयार केले तर त्याला जकात लागली जाते. मी कपडयाचे मटेरियल आणले, त्याच्यावर एम्ब्रॉडरी केली तर मुळ आयटम बदलत नाही. म्हणजे वेगवेगळया शोदार किंवा नक्षीदार लावतात किंवा एकदया कामाचा असा ढाचा असतो की आपण बाहेरची मोटार आणतो आणि या ठिकाणी फक्त भरुन दिले जातात. आपण त्याच्यामध्ये दुसरे काहीही करत नाही. फक्त लेबर वर्क करतो. ते मटेरियल त्यांचेच असते, कव्हरसुध्दा त्यांचेच असते. परंतु, ते जे स्पेअर पार्टचे काम करतात. आपल्याकडे तसे जॉब वर्क ८६ ते ८७ आहेत. आपण ऑलरेडी ते मान्य केलेले आहे. जॉब वर्कच्या हेडखाली ऑक्ट्रॉयचा लॉ आहे. त्याच्यामध्ये ज्या बाबी बसतात. त्या देण्याची तरतुद आहे. या ठिकाणी एक चॅपटर ठेवलेला आहे. त्याच्यामध्ये जे मॉडिफिकेशन होते. तेच या ठिकाणी कम्प्लिट बदलते, मार्केट व्हॅल्यु बदलते, ओनर बदलतो. त्या ठिकाणी तो लागू होत नाही. तो एक सेक्शन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मी स्वतः जॉब वर्क करतो म्हणून मी बोलतो. कारण हे मटेरियल आले तर मला हयाच्यावर काही आकार दयायचा आहे. मी तो आकार देउन परत त्याच व्यक्तीकडे पाठवणार आकार दिल्याशिवाय तो माल या ठिकाणी कशाला पाठवेल? जर त्या मटेरियलला आकार दयायचा नसेल तर तो माणूस त्याच्याकडेच लेबर वर्क करेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

परंतु, त्या मालाची मालकी बदलत नाही. मग तो जॉब वर्कमध्ये येतो.

**रतन पाटील :-**

मग त्याच्यावर जकात कशी होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

जिथे मालकी बदलते तिथे तो क्लॉज फार स्पष्ट आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही वाचून दाखवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

तुम्ही मटेरियल विकत घेउन एखादा जॉब वर्क करित असाल.

**रतन पाटील :-**

संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये असे छोटे कारखाने भरपूर आहेत. हा माझा एकटयाचा प्रश्न नाही. संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये असलेले कारखाने लेबर वर्क करतात. बाहेरुन किंवा वसई, मुंबई, ठाण्यावरुन जॉब आणला जातो आणि त्याची जकात होते. महापालिकेकडे ती जकात जमा होत असेल तर ते मान्य आहे. परंतु, एका ठेकेदाराकडून ती जकात वसुल हाते हे मान्य नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

छोटे-मोठे कारागीर असे मटेरियल आणताना ते स्वतःच्या नावाने जकात करित नाहीत. ते मटेरियल त्या इंडस्ट्रिजमध्ये राहते. म्हणून त्यांना तो जॉब वर्कसाठी लागू होतो. परंतु, एखादी यंत्रणा स्वतःच्या नावाने ते मटेरियल विकत घेते आणि इथे जॉब वर्क करते आणि पुन्हा रिसेल करते. तेव्हा तुम्हाला ऑक्ट्रॉय दयावा लागतो एवढाच त्याचा अर्थ आहे.

**रतन पाटील :-**

मी तेच बोलतो. तुम्ही वसईला आहात. तुमच्याकडे या ठिकाणी वसईवरुन माल आणला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्या शहरामध्ये अमुक एक आयटमला जॉब वर्क दिलेले नाही अशी परिस्थिती नाही. तुम्ही ते समजून घ्या. जिथे मालकी हक्क बदलतो त्यावेळेला ती फॅसिलिटी राहणार नाही असा त्याचा अर्थ आहे.

**शशिकांत भोईर :-**

हयाच्यामध्ये सुधारणा करावी लागेल की ज्यावेळेला मटेरियल ज्या माणसाने आणले. त्याची प्रक्रिया करायला किंवा कॉम्प्युटरचे लुज पार्ट आणले तर त्या माणसाने घेउन जाताना आम्ही हयाचे हे बनवून नेले असे दाखविले पाहिजे. ते त्याच्यामध्ये दाखवलेले आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याकडे सध्या ती प्रणाली वापरण्यात आहे. त्याच्यामध्ये कुठलीही अडचण नाही. आपण जॉब वर्कसाठी त्यांना कार्ड दिलेले आहे. आपल्या शहरामध्ये सक्षमपणे जॉब वर्कचे काम चालू आहे. त्याच्यामध्ये कोणाची अडचण नाही. भविष्यात हे कामकाज करताना आपल्याला काहीतरी प्रबंध असावा म्हणून हे कार्यादेश तयार करताना, हे नियम करताना आपण ते चॅपटर स्पेसिफिकली टाकलेले आहे. परंतु, हया चॅपटरचा कोणी गैरवापर करु नये. त्याच्यामध्ये मालकी हक्कामध्ये मटेरियल आणून इथे प्रोसेसिंग कारखाना करायचा आणि म्हणायचे की मी जॉब वर्क करतो असे कोणालाही करता येत नाही. म्हणून शेवटी मालकी हक्कामध्ये एकदा मटेरियल आणून प्रोसेसिंग केले तर तो धंदा झाला असा क्लॉज टाकलेला आहे.

**रतन पाटील :-**

तो धंदा झाला. ते मॅन्युफॅक्चरिंग झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्याचा तोच अर्थ आहे. तशा माणसाला ती अट लागू राहणार नाही असा त्याचा अर्थ आहे. तुम्ही मुददा समजून घ्या. अशा गोष्टीशिवाय जॉब वर्क करतात. तो सगळयांना अलाउड राहणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही जी आपण दुरूस्ती करतो. तुम्ही हयाच्यामध्ये मोगम निवेदन करा की पूर्वी असे प्रचलित चालत होते. व्यापा-यांच्या सुचना आल्यानंतर त्या सगळया विचारात घेउन आपण हे व्यापा-यांच्या हिताच्या दृष्टिने, ही कारखानदारी इथे टिकली पाहिजे म्हणून आपण ही दुरुस्ती करित आहोत असे करा. म्हणजे आमचे बोलणे होणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की या ठिकाणी सदस्यांनी स्थायी आदेश, जकात आकारणी, मुल्यांकन, संकलन नियमामध्ये जी अंतिम तारिख करायची आहे. त्या अनुषंगाने मी सभागृहात आश्वासित करु इच्छितो की शासनाने आपल्याकडे किंवा नगरपालिकेकडे जकात माफ केलेली आहे. त्याबददल अनुदान देत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पूर्वी मिरा भाईंदर नगरपालिका होती. आपल्याला त्यावेळेला जकात माफ होती. त्यावेळेला नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले. आपल्याला मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या विहित तरतुदीनुसार जकात आकारण्याचे अधिकार

प्राप्त झालेले आहेत. आपण त्याप्रमाणे शहरामध्ये जकात आकारणी करित आहोत. वास्तविक जकात आकारणीसाठी नगरपालिकेचे जे प्रचलित नियम आहेत आणि जकात फन्डामेन्टल लॉ आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी जकातीच्या वसुलीची कार्यवाही चालू आहे. परंतु, कोणत्याही ॲथोरिटीचे कामकाज करित असताना स्वतःचे नियम पाहिजेत. महापालिकेने ते नियम अदयापपर्यंत केलेले नव्हते. प्रचलित नियमानुसार कामकाज चालू होते. मा. उच्च न्यायालयाने महापालिकेने जकातीच्या अनुषंगाने नियम व सध्या आदेश तयार केलेले नसतील तर ते तात्काळ तयार करुन घ्यावेत असे सर्व महापालिकेला निर्देश दिलेले होते. अशा एका नगरच्या प्रकरणात निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने शासनाने सर्व महापालिकांना याबाबतचे महापालिकेचे नियम करणेबाबत आश्वासित केलेले होते. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकासुध्दा तज्ञ व्यक्तीची नेमणुक करुन रिटायर उपजिल्हाधिका-यांनी त्याचा कर ढाचा तयार केला. या ठिकाणी विविध नगरपालिकेचे नियम उपलब्ध करुन घेतले. त्याचा सखोल अभ्यास करुन आपल्याकडे स्थायी समितीच्या माध्यमातून महापालिकेला हा आपला जकात नियम सादर करण्यात आलेला आहे. महापालिकेने जकात नियम मंजुर झाल्यानंतर आपण त्याला नियमानुसार प्रसिध्दी दिली. आपल्याकडे त्याच्यामध्ये कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत. आपण त्या अनुषंगाने सदर जकात मंजुरीकरिता शासनाकडे सदर नियम सादर केलेले आहेत. शासनाने त्याची छाननी केलेली आहे. छाननी करुन त्याचे गॅझेट तयार करण्याच्या स्तरावरिल हे मॅटर आहे. शासन त्याचे गॅझेट अंतिम केल्यानंतर ते नियमात रुपांतर होत आहे. तत्पूर्वी गॅझेट पब्लिसिटीसाठी त्या नियमामध्ये जे स्थायी आदेश तयार केलेले आहेत. आपल्याकडे ते मान्यतेसाठी पाठवलेले आहेत. त्या स्थायी आदेशामध्ये आपल्या नियमात ज्या बाबी आहेत. त्या बाबी आहेत. एकही जास्तीची बाब नाही. हा कायदा प्रणालीचा भाग आहे. मी आपल्याकडे यापूर्वी एक्सप्लेन केलेले आहे. आपण एकदा स्थायी आदेश मान्यता दिल्यानंतर व शासनाने कॉंक्रीट कळविल्यानंतर त्याच्यामध्ये सदर नियमाचे गॅझेट पब्लिश होते. गॅझेट पब्लिश झाल्यानंतर नियमांची अंमलबजावणी करता येते. म्हणजे उदया कोणता वाद निर्माण झाला तर आज आपण प्रचलित नियमांच्या आधारे फन्डामेन्टल लॉच्या आधारे जकात वसुल करतो. आपण त्याच्यासाठी आपले रुल केलेले आहेत. त्याच्यासाठी कोणतीही नविन बाब नाही. या ठिकाणी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि इतर सदस्यांनी ज्या बाबी नमुद केलेल्या आहेत. त्या सर्व बाबींचा उहापोह करुन आपल्या येथील नागरिकांना, येथील व्यापा-यांना व प्रशासनाला जे मान्य असेल त्याच बाबी हयाच्यामध्ये इन्क्ल्युड आहेत. त्या कोणालाही जाचक नाहीत. त्याच्यामध्ये प्रत्येक बाबीची क्लिअरिटी आहे. आपल्याला उदया काम करताना एखादा ठेकेदार नेमायचा असेल तर त्याचे हक्क काय असतील? त्याची कामाची पध्दत काय असेल? आपले अधिकार काय असतील? आता हा कोणताही संशयितपणा भविष्यात राहणार नाही. या अनुषंगाने ही पूर्ण मेहनत घेउन हे केलेले आहे. आपण हयाच्यामध्ये नव्याने काहीही करत नाही. आपण जे ऑलरेडी नियम तयार करुन शासनाला दिलेले आहेत. त्यांनी त्याचा स्थायी आदेश करुन आपल्याकडे पाठवलेला आहे. आपण त्याला टेन्टिटिव्ह मान्यता देतो.

**रोहिदास पाटील :-**

तांत्रिक मान्यता देताना विरोध करण्याचे काहीही कारण नाही. आमच्या सुचनेमध्ये जी काही चिंता आहे. ती तुमच्यासमोर मांडतो. हे स्पष्ट चित्र आहे की जकात किंवा आपल्याकडून मिळालेल्या वागणुकीनुसार आपण महापालिका हददीतील कारखानदार कमी होत चाललेले आहेत. अनेक कारखाने स्थलांतर करुन दुस-या ठिकाणी जात आहेत. अखेर हे सत्य आहे की कारखानदारांच्या उत्पन्नावर आपल्या महापालिकेची प्रगती चाललेली आहे. हे जेवढे स्पष्ट दिसते आपण त्याची तेवढी दखल घेतलेली आहे की नाही. जर दखल घेतली असेल तर आनंद आहे. दखल घेतली नसेल तर दखल घेणे आवश्यक आहे. ही कारखानदारी स्थलांतरी होता कामा नये. आपल्या महापालिकेच्या हददीतून दुस-या महापालिकेच्या हददीत किंवा नगरपरिषद हददीत म्हणजे तिथे महापालिका होत आहे. हा वेगळा विषय आहे. परंतु, लोक त्याच्या पलिकडे जातील. लोक जाण्याचे प्रमाण कमी होईल. आपण त्यांना कुठेतरी पोषक वातावरण दिले तर तुम्ही हया वातावरणात नीट धंदा करु शकता. कारण तुम्हाला या ठिकाणी कमी त्रास होत आहे. आम्ही तुम्हाला सवलत देतो. हे मार्केटिंग आहे. सगळया ठिकाणी सगळया राज्याची जाहिरात होते. गुजरात राज्य म्हणते की आम्ही या ठिकाणी सवलत देतो. तुम्ही आमच्याकडे या. महाराष्ट्र राज्य म्हणते की आम्ही तुम्हाला सवलत देतो. तुम्ही आमच्याकडे या. तसेच, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे धोरण राहिले पाहिजे. आम्ही तुम्हाला कारखानदारी टिकवण्यासाठी सवलती दिलेल्या आहेत. त्यामुळे तुम्ही आमच्याकडे या असे धोरण राहिले पाहिजे. आपण याबाबत व्यवस्थित सांगु शकतो. व्यापा-यांना विश्वास देउ शकतो. जेणेकरुन या ठिकाणी काही लोकांनी कारखाने बंद करुन दुसरे कारखाने वसईमध्ये चालु केलेले आहेत. सगळे गाळे बंद आहेत. तुम्ही आमच्या पूर्वला या. तिथे अनेक ठिकाणी टाळे लागलेले आहेत. ते गाळे विकलेले नाहीत. आपण अशा चांगल्या काहीतरी दुरुस्त्या करुन दिल्या तर ती लोक परत येउ शकतील. त्याची दखल घेतली असेल तर मला पुढे काहीही बोलायचे नाही. दखल घेतली नसेल तर दखल घ्या.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही संबंधित अधिका-यांना दखल घ्यायला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

आपल्या महापालिकेचे नियम अंतिम केलेले आहेत. त्याच्यामध्ये जो दराचा तक्ता आहे. आपण जर बघितले तर सर्व महापालिकांपेक्षा आपले दर फार अंडर कंट्रोल आहेत. उदा. म्हणून सांगायचे झाले तर

मागच्या दोन महिन्यामध्ये आपल्याकडे काही आयटमवर जे दर अडीच टक्के आहेत. ते मुंबई महानगरपालिकेमध्ये सात टक्के आहेत. विशेषतः आपल्या हददीमध्ये दोन महिन्यामध्ये ब्रिलियन्ट कंपनी व परमनन्ट मॅगनेट यांचा रु. २० कोटी ते रु. २५ कोटीचे बिझनेस फायदयाचे चालले आहेत. विशेषतः नवघर, विरार या ज्या चार नगरपालिका होत्या. त्या ठिकाणी जकात माफ होती. म्हणून तुम्ही जे म्हणता ते मी मान्य करु शकतो. तिथे बिझनेससाठी काही छोटे व्यापारी स्थलांतरी झाले असतील तर परंतु आजचे असे चित्र आहे की तिथे महापालिका घोषित होण्याचा जो निर्णय होत आहे. आपले सर्व व्यापारी परत आपल्या शहरात येणार आहेत. त्याच्यासाठी व्यापारी व प्रशासनाला पोषक असे नियम आहेत. हयाच्यामध्ये सुसुत्रता राहणार आहे. प्रशासनाला खूप चांगली मदत होणार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही शंका आहे असे बोलता. परंतु, एखादया ठिकाणी एखादे जनावर मेल्यानंतर एखादे गिधाड पडते. त्याप्रमाणे जकात वसुलीबाबतची परिस्थिती आहे. जकात ठेकेदार एखादी वस्तु पकडली तर त्याचा डबल चार्ज लावतो. आपल्याकडे जी लोक नेमलेली आहेत. ती लोक वसुली करित नाहीत. नगरपालिकेत भरणा होत नाही. आपण वर्ष-दोन वर्षाचा कारकीर्दीमध्ये बघितले आपण आपले पैसे वसुल झालेले नाहीत. १० टक्के पैसे ती लोक घेउन जातात. आपण पैसे घेत नाही. आपल्याकडे पैसे येत नाहीत. आपण हया विषयावर लक्ष केन्द्रित करायला पाहिजे. या विभागावर जे अधिकारी नेमलेले आहेत. त्यांच्यावर लक्ष केन्द्रित केले पाहिजे. जेणेकरुन त्यांचा फायदा तो ठेकेदार घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मलासुध्दा सेम अशीच शंका आहे. कायदा सगळयांना सारखा आहे. तुम्ही एकत्र खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

नगरपालिकेच्या प्रचलित नियमामध्ये दंडाची कार्यवाही अंतिम करायची प्रोसीजर मॅजिस्ट्रेटसमोर आहे. परंतु, आपण आजच्या नियमामध्ये महापालिका, आयुक्तांकडे ते अंतिम केलेले आहेत. हे मंजुर झाल्यानंतर आपण त्याच्यामध्ये आणखी एक्सपर्ट होउ. आपल्याला रक्कम वसुल करण्यासाठी मॅजिस्ट्रेटसमोर ते नियम अंतिम करावे लागत होते. आता आपले स्थायी आदेश किंवा आपल्या नियमामध्ये आपल्याकडे ते अधिकार ठेवलेले आहेत हाच फरक आहे. ते आपल्याला बेनिफिटेड आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कायदा सगळयांना सारखा आहे. परंतु, आज दंड वसुलीची जी कार्यवाही होते. ती आयुक्तांकडे होते. परंतु, तुम्ही आम्हाला सांगा की एखादया माणसाने दंड चुकविला म्हणजे जकात चुकविली तर तो माणूस १० ते ११ टक्के पेनल्टी घेतो. त्याच्यानंतर पालिकेत जमा करित नाही. तो त्याच्याकडे ती दंडाची रक्कम घेतो. जर त्यांनी त्या आयटमचा भाव रु. १०० ते रु. १५० लावला तर त्याच्यावर कोण ॲक्शन घेणार? ते सांगा.

**शशिकांत भोईर :-**

मी आता माल आणलेला आहे. माझा केबलचा बिझनेस आहे. मी फायबर ऑप्टीकची केबल घेतो. मला ज्या भावाने माल मिळतो. त्या भावाने बिल आणले म्हणजेच रु. १६,६००/- चे बिल आलेले आहे. त्यांनी मला जकात रु. २००/- भरल्याची पावती फाडली. त्यानंतर त्यांना काहीतरी डाउट आला. त्यांनी ट्रान्सपोर्टमध्ये टाकलेले होते. ट्रान्सपोर्टमध्ये टाकलेले असताना त्यांना डाउट आला आणि त्यांनी आणखी रु. ४००/- ची पावती फाडली. आधी रु. २००/- ची पावती फाडलेली होती. आणखी वाढवली म्हणजे त्यांनी परत भाव लावला. ज्या भावाने माल आणलेला होता. त्याच्यापेक्षा जास्त भाव लावला. तुम्ही त्याच्यावर ॲक्शन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असा डबल भाव का लावला? त्याच्यावर काय पेनल्टी आहे?

**शशिकांत भोईर :-**

त्या मालाचे बाजार मुल्य तेच आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण सांगता की बिस्लरीची बाटली रु. १२/- आहे आहे. मग रु. १५/- सांगणार तेच ऐकायचे का?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२४ चे वाचन करु का?

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी एक शंका आहे की आम्ही ती नमुद केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील एका माणसाला जकात कॉन्ट्रॅक्टर दंड वसुल करतो आणि आपल्याकडेसुध्दा दंड वसुल करतो. परंतु, जो कॉन्ट्रॅक्टर जबरदस्तीने त्या मालाची किंमत जास्त वाढवतो. तुम्ही त्याच्यावर काहीही ॲक्शन घेत नाही.

**शशिकांत भोईर:-**

त्याच्यावर २५ टक्के वसुली करण्याचे निश्चित केले तर बरे होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याच्यावर १० टक्के वसुली करा. म्हणजे आपले इन्कम वाढेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

जकात आकारणी ही बिलावर होत नसुन मार्केट कॉस्टवर होते. व्यापा-याच्या पध्दती वेगवेगळया आहेत. मी कोणावर आक्षेप घत नाही. व्यापा-यांचे जे बिल प्रोसेसमध्ये धोरण ाआहे. त्याची या ठिकाणी डिटेलमध्ये चर्चा करण्याचा प्लॅटफॉर्म नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

उस दिन बात हुई थी । तब आपने स्पेशल मिटींग जकात के बारेमे रखी थी।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण सदस्यांना बोलावलेले होते. जकातच्या विषयावर खूप चांगली चर्चा झालेली होती.

**हंसुकुमार पांडे :-**

सब व्यापारी आये थे ।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही डिपार्टमेन्टने सर्व असोसिएशनला लेखी कळविलेले आहे. परंतु, आता ती परिस्थिती नाही.

**शशिकांत भोईरः-**

आता ती परिस्थिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आता ती परिस्थिती नाही. जर तसे कोणी भरले असेल तर आमच्याकडे आक्षेप करायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही सांगा की जर त्या माणसाने या रु. १००/- च्या बिलाचे रु. १२५/- लावले. म्हणजे रु. २५/- जास्त लावलेले आहेत असा याचा अर्थ झाला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मग तसे जास्तीचे पैसे भरायचे नाहीत. जर तशी कोणी मागणी केली तर तुम्ही आमच्याकडे तसे आक्षेप नोंदवायचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्यांना काय पेनल्टी चार्ज करणार आहात? ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण तशी पेनल्टी लावू शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही पेनल्टी लावू शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

तसे नियमबाहय म्हणजे जास्तीची अमाउन्ट मागवू शकत नाही. तुमच्या बिलामध्ये प्रॉब्लेम असेल तर मागवु शकता.

**शशिकांत भोईर :-**

माझ्याकडे बिल आहे. मी आता बिल घेउन येतो. माझ्याकडून जास्त पैसे घेतलेले आहेत. तुम्हाला अर्धा तास वेळ असेल तर मी आता बिल मागवतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

साहेब, तशी कोणाची वैयक्तिक अडचण असेल तर तुम्ही आमच्याकडे मॅटर घेउन येउ शकता. आपण त्याच्यावर चर्चा करुया.

**शशिकांत भोईर :-**

माझे असे म्हणणे आहे की जर असे एकटयाचे व्हाउचर लावून ऑक्ट्रॉय वसुल केला तर आपण कार्यवाही करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आपण आपले अधिकार बजावत नाही असा याचा अर्थ होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा कॉमन इश्यु आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपण कॉमन इश्यु सेटल केलेला आहे. परंतु, आज ती परिस्थिती नाही. आपण या ठिकाणी सर्व व्यापा-यांची बैठक घेतलेली होती.

**शशिकांत भोईर :-**

माझा माल परवाच्या दिवशी आलेला होता. मग असा चार्ज कशाला लावला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

या ठिकाणी इन्डिव्हिज्युअल मालाबाबत चर्चा होउ शकत नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, हा कॉमन इश्यु आहे.

**रोहिदास पाटील :-**

जे डिस्प्युटेबल मॅटर असेल ते मा. आयुक्तांच्या राईटमध्ये चालले पाहिजे असे तुम्ही सांगितलेले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

यायला पाहिजे ना?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ते मॅटर त्यांना देता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आमच्याकडे कुठले मॅटर आले तर आम्ही त्यांच्याकडे देत नाही. आम्ही त्याच्यावर निर्णय घेतो.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुम्हाला तुमच्या अधिकाराची जाणीव करुन देतो. आमची अशी अपेक्षा आहे की जेव्हा आम्ही ही बाटली रु. १२/- ला आणली. ते बोलतात की ही बाटली रु. १५/- ची आहे. तर त्यांनी तुमच्याकडे अप्लाय केले पाहिजे. हा माल त्यांनी इतक्या रुपयाला आणलेला होता. त्यांचे मत असे आहे की हा माल प्रविण लेबर कंपनीने आणलेला आहे. तो माल रु. ५ हजाराचा नसुन रु. ८ हजाराचा आहे. रु. ३ हजार ही डिस्प्युटेड अमाउन्ट आहे. याबाबत मा. आयुक्तांनी निर्णय दयावा. ती जी गाडी थांबवून ठेवतात. तो माल रु. २ हजारचा आहे आणि गाडीचे भाडे रु. ३ हजार आहे. तुमच्यासाठी भाडयाचा गाडीवाला किती वेळ थांबेल ते सांगा. तुम्ही हयाच्यामध्ये दुरुस्ती केलेली नाही. मी त्या बैठकीला आग्रह धरलेला होता की तुम्ही हया गोष्टीवर आग्रह करा. तो जिथे-जिथे डिस्प्युटेड सांगेल त्यांनी तुमच्याकडे त्या केसेस वर्ग केल्या पाहिजेत. तुम्ही आम्हाला सांगता की तुम्ही या ठिकाणी परमिशन घेउन या. इथेच फरक पडतो. तेव्हा त्याला आग्रह करायला सांगितले तर कोणीही ते करणार नाही आणि लोकांना खरोखर न्याय मिळेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी याबाबत तुम्हाला खुलासा करु इच्छितो आपल्या शहरातील काही नागरिक व व्यापारी इतके व्यवस्थित आहेत की त्यांनी रु. १०, रु. १००/-, रु. २०/-, रु. ५/- पर्यंत जो एक्सेस ऑक्ट्रॉय दिलेला आहे. तुम्ही त्याबाबत असे म्हणता की त्यांनी आपले बिल आणि इन्व्हाईसचे चार्ज करुन आमच्याकडे दिलेले आहेत. महिन्याला रु. ५ हजार ते रु. ७ हजार म्हणजे त्या लोकांना माल लवकर घेउन जाण्याची घाई असते. आम्ही तशी रिफन्डची ऑर्डर दिलेली आहे. ऑर्डर दिलेली नाही असे नाही. परंतु, आपल्यासमोर ती वस्तुस्थिती यायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

माझ्याकडे त्याची माहिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही निर्णय घेतलेला नाही असे काहीही नाही. आमच्याकडे असे भरपूर मॅटर आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही प्रक्रियेत बदल करावा असे सांगतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

जर एखादा व्यापारी तिथे सुमोठे मान्य करित असेल तर आपण त्याला या ठिकाणी काय निर्णय घेणार? आपण त्याची बाजु घेत नाही. तुम्ही निर्णय समजुन घ्या. एक्स.,वाय,झेड ने मान्य असेल त्या ठिकाणी ऑक्ट्रॉय केला आणि त्यांनी रु. १०/- जास्तीचा ऑक्ट्रॉय मागितला तर त्यांनी त्याच्यामध्ये आक्षेप नोंदवला पाहिजे. जर तो माणूस तिथुन सर्व काही भरुन घरी जात असेल तर आपण नंतर त्याच्याशी चर्चा करित असू.

**शशिकांत भोईर :-**

तो ट्रान्सपोर्टवाला भांडत बसणार नाही. त्याला त्याची माहिती ट्रान्सपोर्टमधून घेउन जायची आहे. तो कसा भांडणार? माझ्याजवळ माल आल्यानंतर मला माहिती पडेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

हया कामकाजामध्ये अडचणी आहेत. त्या निश्चितपणे दुर होउ शकतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की जर तुम्ही नागरिकांकडून दंड वसुल करता तर तुम्ही कॉन्ट्रॅक्टरकडूनसुध्दा दंड वसुल करा. त्यांनी आमची रु. १२/- ची बाटली रु. १५/- ला लावली तर त्यांनी रु. ३/- जास्त घेतलेल आहेत. त्याच्यावर आणखी १० टक्के म्हणजे रु. ३०/- दंड वसुल करा आणि तो दंड पालिकेमध्ये जमा करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की कॉन्ट्रॅक्टरला नियमबाहय जास्तीची रक्कम वसुल करण्याचे राईटस नाहीत. त्याला दंड लावण्याचा प्रश्न येत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

परंतु, ते दंड वसुल करतात त्याचे काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कॉन्ट्रॅक्टर तसे जास्तीचे दंड वसुल करतात. त्याच्यावर काय ॲक्शन होणार आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

महापालिकेच्या ॲग्रीमेन्टमध्ये कॉन्ट्रॅक्टरला तसे कोणतेही जास्तीची वसुली करण्याचे अधिकार नाहीत.

**हंसुकुमार पांडे :-**

परंतु, ते जास्तीचे दंड वसुल करतात.

**शशिकांत भोईर :-**

मी तुम्हाला अर्ध्या तासामध्ये निदर्शनास आणून देईन. मी तुम्हाला बिल आणून देईन. या ठिकाणी कम्पलसरी लिहिलेले आहे. त्याच्यामुळे त्याचे व्याज कापलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

मी या ठिकाणी त्या गोष्टींबाबत बोलू शकत नाही. आपल्या बिलाच्या प्रोसेसमध्ये खूप मोठे प्रॉब्लेम आहेत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तसे नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

तुम्ही तुमची वैयक्तिक केस घेउ नका.

**शशिकांत भोईर :-**

मी माझी वैयक्तिक केस घेत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

माझ्याकडे आज इन्व्हॉईस इन्कम टॅक्सचे असे बिल आहे की एस.टी.बी.टी. वगैरे लावलेले आहेत. त्याच्यामध्ये रु. ६० हजाराचे बिल रु. दिड लाख ते रु. २ लाख ते रु. ३ लाख असे दिलेले आहे. त्यांनी रु. ३ लाखाशिवाय ऑक्ट्रॉय भरलेला आहे. त्यांनी कंपनीकडून नंतर दुसरे इन्व्हॉईस मागितलेले होते किंवा ते मटेरियल फोडल्यानंतर डबल, तिबल निघालेले आहेत. अशा खूप केसेस आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे १०० टक्के बरोबर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

दोन्हीकडे बरोबर आहे. म्हणजे आपण त्या कॉन्ट्रॅक्टरला न्याय कसा दयायचा? ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही चुकीचे बोलत आहात. व्यापा-यांकडून दंड वसुल करता तर तुम्ही ऑक्ट्रॉय भरुन दंड वसुल करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्यांना दंड वसुल करायचे अधिकार नाहीत. त्यांनी दंड वसुल करु नये. त्यांनी फक्त रितसर ऑक्ट्रॉय घ्यावा. समजा, एखादया व्यापा-याची काही चुक असेल तर तो जास्तीचा दंड लावु शकत नाही. आम्ही त्याबाबत सर्व व्यापा-यांना लेखी आश्वासित केलेले आहे. तुम्ही त्यांना दंड भरु नका असे सांगू शकत नाही. आमच्याकडे दंड भरण्याची मागणी करा. दंड मागणी करताना त्यांनी भरायचा नाही असे आम्ही लेखी पत्र सर्व असोसिएशनला दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

ते दंड आकारत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

त्यांना दंड आकारण्याचे अधिकार नाहीत. त्याला कोणी बळी पडायचे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तोसुध्दा हुशार आहे. तो त्याची किंमत वाढवतो. तो अशा पध्दतीने दंड वसुल करतो की तो मालाची किंमत वाढवतो आणि त्याप्रमाणे दंड वसुल करतो. तो मालाची किंमत वाढवतो आणि पैसे घेतो. आमचे एवढेच म्हणणे आहे की तुम्ही त्या पध्दतीनें नागरिकांकडून दंड वसुल करता त्याप्रमाणे कॉन्ट्रॅक्टरकडून दंड वसुल करा.

**रोहिदास पाटील :-**

मी खाजगीमध्ये बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

मला रु. २००/- ची रिसीट मिळाली की रु. ४००/- ची रिसीट मिळाली तर मी गप्प बसेन असे नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

गप्प बसायचे नाही. आपले तिथेच चुकते.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही त्याबाबत ॲक्शन घ्या. तुम्ही त्यांच्याकडून १० टक्के दंड वसुल करणार का?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही एका नगरसेवकावर असा आरोप करता हे योग्य नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

मी आरोप करित नाही.

**शशिकांत भोईर :-**

ते बोलतात की मी खाजगीमध्ये बोलतो. तुम्ही खाजगीमध्ये बोलू नका असे माझे मत आहे. तुम्ही बोलले परंतु हया नांरिकांना त्रास होतो. माझ्याकडे बिल आहे. संपुर्ण पुरावा आहे. तुम्ही पाहिजे तर तो माल माझ्या कंपनीवर आलेला आहे की नाही ते पाहणी करु शकता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

तसे असेल तर माझ्याकडे तशी तक्रार दया.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही त्याबाबत ॲक्शन घेत नाही. तुम्ही त्याच्यावर ॲक्शन घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

आम्ही १०० टक्के ॲक्शन घेतो.

**शशिकांत भोईर :-**

तुमचे पैसे रिटर्न देणार तर त्याच्यावर १० टक्के दंड वसुल करणे योग्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

आपल्याला १० टक्के दंड वसुल करण्याचे अधिकार नाहीत. आपल्या ॲग्रीमेन्टमध्ये तसे नमुद केलेले नाही. आपल्या कायदयामध्येसुध्दा तसे नाही.

**एस.ए.खान :-**

तुम्ही पुढच्या वेळेला ती ॲग्रीमेन्ट सुधारा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

आपल्याला असे अधिकार नसताना नियमाच्याबाहेर जाउन कोणालाही कार्यवाही करता येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला दंड वसुल करायचे अधिकार नाहीत ते तुम्हाला माहिती आहे. त्यामुळे कोणालाही कार्यवाही करता येत नाही. ते कार्यवाही करतात हेही तुम्हाला पटलेले आहे. त्यांनी काय चुकीची मागणी केलेली आहे ती सांगा. जर तो कॉन्ट्रॅक्टर चुकीची मागणी काम करित असेल किंवा चुकीची मागणी करित असेल तर तो माणूस टेन्शन तयार करतो. पहिल्यांदा रु. १० हजार पाहिजे असे सांगितले किंवा रु. ७ हजार पाहिजे असे सांगितले. परंतु, त्याला माहिती आहे की रु. ३ हजार ते रु. ४ हजारामध्ये पटते. त्याला रु. ३ हजार ते रु. ४ हजार बेकायदेशीर मिळतात. तो तेवढा खर्च करतो आणि रु. ३ हजार ते रु. ४ हजार बचत करतो. तुम्ही त्या प्रोसिजरला ब्रेक लावण्याच्या दृष्टिने तुम्ही त्या ठेकेदाराला पेनल्टी चार्ज करा. तुम्ही घाबरता कशाला? तेच मला समजत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सा़ो.) :-**

तशी गरज पडली तर तुम्ही आमच्या निदर्शनास एखादी विशेष बाब म्हणून एखादा प्रस्ताव घेउन येउ शकता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण हा विषय चालविलेला आहे त्याच्यामध्ये सुधारणा होणार नाही. कारण हयांचे दुर्लक्ष होत आहे.

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाला पाठीशी घालता असे मला या ठिकाणी दिसते. मी तुमच्यावर आरोप करतो की तुम्ही ठेकेदाराला पाठीशी घालत आहात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तो ठेकेदार डबल पैसे का बोलतो?

**नगरसचिव :-**

(प्रकरण क्र. १२३ च्या ठरावाचे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १२४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. सभापती सा़ो. :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १२४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे  कलम ४६६ मधील अनु. अ ते ब (सलग एकूण ८ मुद्दे) नुसार जकातीची आकारणी, मुल्यांकन व संकलन ह्यांचे नियमन करण्याकरिता केलेले ''स्थायी आदेश'' (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१०/२००६ रोजीचे तहकूब प्रकरण क्र. ११८)

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी स्थापन झाली असुन जकात विभागाचा कारभार मु.प्रा.म.अ. १९४९ व महाराष्ट्र नगरपालिका जकात (नियम) १९६८ नुसार चालू आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ नुसार मा. आयुक्त यांनी जकात संदर्भात '' स्थायी आदेश'' तयार करून स्थायी समितीस सादर करण्याची तरतुद प्रस्तावित आहे. या अधिनियमांच्या तरतुदीशी, नियमांशी, तसेच उपविधिशी सुसंगत असतील असे '' स्थायी आदेश'' (इंग्रजी व मराठी भाषेमध्ये) मा. आयुक्तांकडून तयार करण्यात आलेले आहेत.

सदर ''स्थायी आदेशा'' स मु.प्रा.म.अ. १९४९ चे कलम ४६६ पोटकलम (२) नुसार स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. रविंद्र माळी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२५ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

दि. १४/७/२००६ च्या ठरावाचे काय? तो वाचून दाखवा.

**रतन पाटील :-**

हयाच्यामध्ये फेरबदल करावा लागेल. हयाच्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढायला पाहिजे. आपण जो काही शाळेचा हॉल दयायचे बंद केलेले आहे. काही कार्य असो किंवा सांस्कृतिक, धार्मिक किंवा कोणतीही मागणी केलेली आहे. आपण तो बंद केलेला आहे. त्याच्यामुळे महापालिकेचे उत्पन्न बुडत आहे.

**मा. सभापती सो. :-**

आपण हॉल कधी भाडयाने दयायचा आहे?

**रतन पाटील :-**

आपण सुटटीच्या दिवसात हॉल भाडयाने दयायचा आहे.

**मा. सभापती सो. :-**

सुटटीच्या दिवशी असू दे.

**रतन पाटील :-**

आपण हॉल सरसकट भाडयाने देणे बंद केलेले होते.

**मा. सभापती सो. :-**

हॉल सुटटीच्या दिवशी भाडयाने देणे अशी दुरुस्ती करुन घेणे.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा यांनी प्रकरण क्र. १२५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही प्रथम मैदानाचा उल्लेख केलेला नाही. हयाच्यामध्ये मैदान यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आता सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की महापालिकेचे उत्पन्न वाढते. आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. त्याचबरोबर लोकांची सोय झाली पाहिजे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होत आहे की आपण लग्नासाठी हॉल दयायला पाहिजे. आमच्या खेडेगावात जागा राहिलेली नाही. दुसरा प्रश्न असा आहे की सर्व लग्नाच्या तारखा सुटटीच्या दिवशी नाहीत. आपण मुहूर्त बघतो आणि लग्न संध्याकाळी असते. त्यामुळे शाळेला डिस्टर्ब होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याच्यासाठी काहीतरी कन्डिशन टाका.

**जयंत पाटील :-**

लग्न संध्याकाळी असल्यामुळे शाळेला डिस्टर्ब होत नाही. दुस-या दिवशी त्यांनी ताबडतोब मंडप रात्रीच्या रात्री काढून घेतला पाहिजे. हयाच्यामध्ये ही सुचना ॲड करा.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही त्याच्यासाठी डिपॉझीट ठेवा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही डिपॉझीटची अट टाका.

**रोहिदास पाटील :-**

डिपॉझीटसाठी चांगली रक्कम ठेवा.

**दिपक खांबित :-**

फक्त नवघरच्या मैदानामध्ये कार्यक्रम ठेवा. आपल्याला सुभाषचंद्र बोस मैदानसुध्दा दया.

**शशिकांत भोईर :-**

आपण या ठिकाणी शाळेच्या मैदान सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भाडयाने देउ नका.

**जयंत पाटील :-**

आपण सुभाषचंद्र बोस मैदान भाडयाने देत नाही आणि आपण ते मैदान कधीही सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भाडयाने दिलेले नाही. या ठिकाणी त्या मैदानाचा विषय आलेला नाही.

**रतन पाटील :-**

नवघर शाळेचे मैदानसुध्दा भाडयाने दया.

**जयंत पाटील :-**

आपण या ठिकाणी शाळेच्या मैदानाबाबत बोलत आहोत. सुभाषचंद्र बोस मैदान शाळेचे मैदान नाही.

**रतन पाटील :-**

मैदानाच्या साफसफाईचे रु. ५००/- दयावे लागतील.

**मा. सभापती सो. :-**

मैदान साफसफाईचे रु. १०००/- होतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याच्यासाठी डिपॉझीट वाढवा.

**जयंत पाटील :-**

दुसरा विषय असा आहे की शाळेच्या पॉवर वापरु नये. जर पॉवर वापरायची असेल तर तुम्ही त्यांना स्पेशल मीटर दया.

**मा. सभापती सो. :-**

आम्ही रु. २००/- नमुद करायला सांगितलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

दोन मीटर वायरला रु. ७ हजार ते रु. ८ हजार लागतात. ते रिलायन्समार्फत मिळते.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, ती लोक तुमच्या शाळेची पॉवर वापरतात.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना लग्नाच्या वेळेला भरपूर पॉवर लागते.

**जयंत पाटील :-**

परंतु, त्याच्यामध्ये मीटर लावण्यासाठी विशेष असे काहीही नाही.

**रोहिदास पाटील :-**

प्रोसीजरमध्ये असेल तर करा.

**रोहिदास पाटील :-**

लग्न मोठे असेल तर जनरेटर आणतात.

**दिपक खांबित :-**

शाळेचे भाडे जास्त आहे.

**जयंत पाटील :-**

आमची भाडयाबाबत तक्रार नाही.

**दिपक खांबित :-**

रु. २ हजार भाडे आहे.

**रतन पाटील :-**

डिपॉझीट रु. ५ हजार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

माझी या ठिकाणी एक सुचना आहे की जत्रा आणि मेले यांना हॉल भाडयाने देउ नका.

**शशिकांत भोईर :-**

आपण जत्रा आणि मेला यांना भाडयाने देणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)सो.) :-**

आपल्याला इलेक्ट्रिकल खर्च वसुल करायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मालवणी जत्रेला मैदान अजिबात भाडयाने देउ नका. जत्रा आणि मेलांना मैदान भाडयाने दयायचे नाही असे मी सांगितलेले आहे.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये जत्रोत्सव होणे हे महापालिकेला एक भुषण आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही इलेक्ट्रिक मीटरप्रमाणे बिल घ्या.

**रतन पाटील :-**

आपल्या शहरामध्ये एकही जत्रोत्सव होत नाही. आपल्याकडे इतक्या चांगल्या पध्दतीने म्हणजेच सात दिवसांनी ........

**मा. सभापती सो. :-**

त्याच्यामध्ये सात दिवस वाढतात.

**रतन पाटील :-**

मी मागच्या वेळेला बंदी केली तर तुम्ही त्या ठिकाणी दोन जत्रोत्सव भरवलेले होते. तुम्ही त्याच्यामध्ये काही परफेक्ट करा. काहीतरी ॲक्शन घ्या.

**मा. सभापती सो. :-**

आता तसे होणार नाही. आपण इलेक्ट्रिकचा खर्च हयाच्यामधून बसवुन घेउया.

**रतन पाटील :-**

तसे नाही. आपल्या महापालिकेचे उत्पन्न बुडत आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे एक चांगला उत्साह होतो.

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी एक सुचना आहे की ज्या शाळेच्या ठिकाणी हॉल असतील तेथील जेवण बनविण्याची किंवा जेवण बाहेरुन आणून त्याची जी खानपानाची व्यवस्था असेल ती रदद करा. कारण खारीगांव शाळेत खरकटी, उष्टी सगळे त्या तलावात टाकतात आणि निघून जातात. तिथे कृपा करुन जेवण्याची परमिशन देउ नका. जेवण बनविणे किंवा जेवण देणे वगैरे बंद करा. कारण त्या ठिकाणी जेवण बनवायला दिले तर उष्टी भांडी किंवा राहिलेले खरकट असते ते तिथे टाकून लोक निघून जातात. ते घाणपाणी, खरकट, उष्ट वगैरे सर्व काही त्या तलावात सोडतात. त्यामुळे त्या ठिकाणी डबके तयार होते. खारीगावच्या शाळेत जेवण्याची परमिशन देउ नका. दुसरीकडे उपाययोजना असेल तर तिथे जेवण्याची व्यवस्था दया. तलावाच्या बाजुला भांडी घासतात, धुणी धुवतात आणि ते खरकटे तलावात टाकतात. त्यामुळे त्या ठिकाणी डबके होते. त्याच्यामध्ये एवढी मोठी खराब मासळी मरतात.

**रतन पाटील :-**

तो छोटा हॉल आहे. त्या ठिकाणी जेवण्याची व्यवस्था नाही.

**मा. सभापती सो. :-**

आपण त्याच्यासाठी तिथे ताकीद देउन ठेवूया. आता एक विषय मंजुर आहे.

**रतन पाटील :-**

मला या ठिकाणी मैदानाच्या संदर्भात असे सांगायचे आहे की तुम्ही हे मैदान सुटटीच्या दिवशी भाडयाने दया.

**मा. सभापती सो. :-**

आपण मैदान सुटटीच्या दिवशी भाडयाने दिलेले आहे. तुम्ही सुटटीच्यावेळेला मैदानामध्ये जत्रा वगैरे ठेवा.

**रतन पाटील :-**

मैदानात जत्रोत्सव होणार नाही.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आम्ही त्या मैदानाच्या शेजारी राहतो. सन्मा. सदस्या प्रभात पाटील तिथे राहतात. तिकडे मोठे-मोठे चक्र आणि इतर मशीन लावतात. त्याच्यामुळे धुळ होते, प्रदुषण होते, आवाज वाढतो. तुम्हाला त्यासाठी वेळीच बंधन दयावे लागेल की शासनाच्या आदेशाप्रमाणे रात्री १० वाजेपर्यंत मैदान भाडयाने दयायचे आहे. तुम्ही त्याच्यानंतर स्पिकर लावु शकत नाही. रात्री १.०० वाजेपर्यंत स्पिकर लावलेला असल्यामुळे आम्हाला झोप येत नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही चक्र वगैरे लावायला परमिशन देउ नका.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही रात्री १०.०० वाजेपर्यंतचा टाईमिंग ठेवा आणि चक्र वगैरे लावायला परवानगी देउ नका.

**जयंत पाटील :-**

तुम्ही शासनाच्या निर्णयाप्रमाणे रात्री १०.०० वाजेपर्यंत परमिशन देउ शकता.

**दिपक खांबित :-**

मैदान तर दिवसभर पॅक असते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याला जत्रा वगैरेला एक दिवसासाठी मैदान भाडयाने देणे परवडत नाही.

**रतन पाटील :-**

मैदान सुटटीच्या दिवशी भाडयाने दयायचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

जर मैदान भाडयाने दिल्यानंतरच्या मधल्या काळात सुटटया आल्या नाही तर काय करणार?

**रतन पाटील :-**

मैदान सुटटीच्या वेळेत भाडयाने दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याला शाळेतील नागरिकांना मदत करायची आहे.

**जयंत पाटील :-**

मग चौपाटीवर सांस्कृतिक कार्यक्रम होउ दया. चौपाटीवर मैदानाची सोय आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, नवघर शाळेचे मैदान मध्यवर्ती ठिकाणी आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुमच्या घराच्यासमोर जत्रा भरते.

**जयंत पाटील :-**

आमचा याला विरोध आहे.

**एस.ए.खान :-**

चौपाटीवर जत्रा घ्या.

**दिपक खांबित :-**

हयाच्यामध्ये बदल करावा लागेल.

**एस.ए.खान :-**

मग मागील सर्व ठराव रदद करावे अशी माझी या ठिकाणी सुचना आहे.

**मा. सभापती साो. :-**

आपण त्यांना ताकीद देउया. जे काही खरकटे असेल किंवा जेवणाचा प्रॉब्लेम होतो. आपण तिथे आपली माणसे बसवून खरकटे टाकायचे नाही असे सांगूया. असे सांगणे तुमचे कर्तव्य आहे की नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही महापालिकेच्या खर्चाने जे टेलिफोन घेतले ते टेलिफोन चालले पाहिजे की नाही. आम्हाला तुमचा टेलिफोन मिळत नाही. महापालिकेचे कर्मचारी आहेत म्हणून सगळया अधिका-यांना मोबाईल दिले. ते जनतेच्या सेवेसाठी दिलेले आहेत. ते टेलिफोन दिल्यानंतर ते चालू ठेवणे हे तुमचे काम आहे. परंतु, तुमचे टेलिफोन चालत नाहीत. काय कारण आहे ते सांगा. तुमचा पीस खराब असेल तर डयुप्लिकेट माल घेतला असे जाहिर करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

काही अधिकारी मोबाईल चालु ठेवत नाहीत अशा लेखी आमच्याकडे तक्रारी आलेल्या होत्या. आपण तक्रारी केलेल्या होत्या. आम्ही त्या अनुषंगाने सर्व मोबाईलधारकांना लेखी सुचना दिलेल्या आहेत. हयाच्यापुढे जर कोणाची तक्रार आली तर तुमच्यावर डिपार्टमेन्टली कार्यवाही केली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

असा दुसरा आदेश काढा. स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानुसार असा कडक आदेश काढा. मी त्याच्या पलिकडे जाउन सांगतो की ही गोष्ट खरी आहे की तुम्ही त्या टेलिफोनचे बिल भरलेले नाही. त्यामुळे टेलिफोन डिस्कनेक्ट होत आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

अशी परिस्थिती नाही. रिलायन्स कंपनीकडून डेटा बेस कॉम्प्युटरला फिड असतात. त्यांनी आपल्याला ते बिल उशिरा दिलेले आहे. मध्यंतरी त्यांनी हाफ दिवसाची सेवा काढून घेण्याचा निर्णय घेतलेला होता. आम्ही ही भावना रिलायन्सच्या वरिष्ठ अधिका-यांना कळवलेली आहे. त्यांनी माफी मागितलेली आहे. हयाच्यापुढे असे होणार नाही. मध्यंतरी अर्धा दिवस प्रॉब्लेम आलेला होता. त्यांनी आपल्याकडे पंधरा दिवस जुनी बिले पाठविलेली होती. हा महापालिकेच्या अस्मितेचा विषय आहे. आम्ही त्यांना निर्देश दिलेले आहेत. आम्ही त्यांना लेखी कळवलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेच्या अस्मीतेचा विषय आहे. त्यांची चुक आहे त्यांनी एवढया मोठया महापालिकेला दिलेली सर्व्हिस आहे. ती लोक आपल्यावर तुम्ही पैसे भरलेले नाहीत असा ब्लेम करतात. म्हणून आम्ही तुमची सर्व्हिस कट करतो. आपली हयाच्यामध्ये किती नामुष्की आहे ते बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.)साो.) :-**

ती त्यांची चुक होती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्यांना असे पुन्हा होता कामा नये असे कडक पत्र दया. त्यांनी दिलगिरीची मा. आयुक्तांच्या नावाने दिले पाहिजे. ही आमच्या अधिका-याकडून झालेली चुक आहे. त्याबददल आम्ही दिलगिरीची विनंती करतो असे त्यांनी सांगितले पाहिजे. त्यांची काय लायकी आहे? आपली एवढी मोठी महापालिका असताना त्यांनी आपली लाईन बंद का करायची?

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तो कॉम्प्युटरचा विषय झाला.

**प्रकरण क्र. १२५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा इमारती मधील वर्ग, हॉल सांघिक उपासने करीता भाड्याने देणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १४/०७/२००६ ठराव क्र. ४६ वर पुर्नविचार करून निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. १२८ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. १४/०७/२००६ ठराव क्र. ४६ मध्ये बदल करून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील शाळा इमारतीमधील वर्ग, हॉल शाळेचे मैदान फक्त शाळांच्या सुट्टीच्या दिवसात मागणीनुसार यापूर्वी मा. स्थायी समितीने ठरविलेल्या भाड्याने देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. साफसफाई, विद्यूत वापर, पाणी वापराकरिता रू. २००/- प्रति दिन डिपॉझीट घेण्यात यावी. विद्यूत वापराचे मिटर नुसार रक्कम घेण्यात यावी. महानगरपालिकेच्या मालमत्तेची नासधूस केल्यास किंवा साफसफाई न केल्यास सदर डिपॉझीट जप्त करण्यात यावी. नवघर शाळेचे मैदान लग्नकार्याकरिता मागणीनुसार रू. ५०००/- डिपॉझीट व भाडे घेउन देण्यात यावे. तसेच शाळेच्या दिवशी मैदान भाड्याने देता येईल. परंतु, त्यावेळेत स्पिकर लावता येणार नाहीत. तसेच मंडप व इतर सामान कार्यक्रम झाल्यानंतर त्याच रात्री काढून टाकणेची सक्ती करावी.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.          अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२६ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा.सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की आपण जेव्हा लेखार्शीष बनविले. तेव्हा त्याच्यामध्ये वाहनांसाठी जे इंजिन आणि स्पेअर-पार्ट लागतो. त्याच्यासाठी गेल्या बजेटमध्ये तरतुद केली असेल असे मला वाटते. आपण ब-याच लेखांचे शीर्ष वापरतो. सामान्य प्रशासनबाबत नं. ११ मध्ये बघा. नं. ११ मध्ये पेट्रोल, इंधन, वंगण व वाहन दुरुस्तीबाबत त्यांच्याकडे रु. ५० लाख होते. त्याच्यापैकी फक्त रु. १६ लाख शिल्लक आहेत. आपण दुस-यांकडून घेतो. इतर कर, पेट्रोल, इंधन, वाहन दुरुस्ती रु. ७ लाख असताना आपण त्यांच्याकडून रु. ५ लाख घेतो. त्याच्यानंतर नं. ३ ला अग्निशमन, वाहन, इंधन व निगाबाबत आपण त्याचे रु १२ लाखमधून रु. ८ लाख घेतो. मात्र या ठिकाणी शिल्लक तेवढीच आहे. नं. ४ ला प्राथमिक, माध्यमिक शिक्षण सहा वॉर्ड दुरुस्ती व निगाबाबत आपले १ लाख त्याच्यामधील रु. ७७ हजार वापरलेले आहेत. मग आपल्याकडे ते उपलब्ध आहेत. नंबर ५ मध्ये मागच्यावेळेला झालेला खर्च असा आहे की पाणीपुरवठाची १५ वाहने, इंधन भाडे, निगा असे त्यांच्याकडे ४ लाखमधून रु. ३ लाख ४३ हजार शिल्लक आहेत. आपण या ठिकाणी शीर्ष वेगवेगळे घेतो. सध्या तेथील वाहने चालु आहेत. या ठिकाणी मागच्या वेळेला असलेली पाणीपुरवठयाची १५ वाहने असा खर्च दाखवलेला आहे. ही वाहने नक्की अस्तित्वात आहेत का? याचासुध्दा विचार करावा. आपण डायरेक्ट शीर्ष बदली करतो. त्याच्यामध्ये वाहनांकरिता खर्च दिलेला आहे. मोठया वाहनांकरिता - अग्निशमनची ४ वाहने, इंधन व निगा यांचा खर्च दिलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

तुमचा मुददा माझ्या लक्षात आलेला आहे. मी त्याचा खुलासा करतो.

**शशिकांत भोईर :-**

आपण जेव्हा ही शीट तयार करतो. तेव्हा आपल्याला जेवढे इंधन, वंगण लागेल. आपण त्यासाठी त्यावेळेला तरतुद करणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

महापालिकेमध्ये विविध विभागामध्ये विविध वाहने आहेत. आरोग्य विभाग, साफसफाई, अग्निशमन विभाग, मुख्य कार्यालय इत्यादी ठिकाणी त्या-त्या प्रमाणात करावयाच्या बजेट सुचीमध्ये वाहन दुरुस्ती व इंधन उपलब्धीबाबत तरतुद आहे. त्याप्रमाणे त्याची टोटल कार्यवाही केली जाते. वास्तविक आपल्यासमोर त्यांनी हे डिटेलमध्ये मांडलेले आहे. हयाच्यामध्ये लहान वाहने आणि मोठी वाहने हयाच्यामधील जी गोषवा-याची रु. ३४ लाख रक्कम आहे. आपल्याकडून ही प्रशासकीय मान्यता अपेक्षित आहे. त्या अंर्तगत ते वाहन त्याच्यामध्ये समाविष्ट आहे. त्यांनी सर्व डिटेल दिलेले आहे. वास्तविक ते संपूर्ण लहान वाहन आहे. मोठया वाहनाबाबत

प्रशासकीय व वार्षिक खर्चाच्या स्पेअर पार्टची ही निविदा आहे. बजेट तरतुदीमध्ये जशी तरतुद दाखवलेली आहे. त्यांनी तसे विभाग वाईस दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

आता आपल्याकडे जेवढी वाहने आहेत. ती चालु स्थितीत आहेत की बंद स्थितीत आहेत ते प्रथम सांगा. कारण जिथे-जिथे वाहने दाखवलेली आहेत. ती जास्त दाखवलेली आहेत. आपण भाडयाने बरीच वाहने घेतलेली आहेत. आपण त्याच्यामध्ये वर्ग -१ आणि वर्ग-२ च्या अधिका-यांना वाहने देतो. त्यांना ठेकेदार पाहिजे त्यावेळेला वाहने उपलब्ध करुन देउ शकत नाही. मग तुम्ही त्या अधिका-यांना तशी ताकीद दया. मध्यंतरी दोन ठराव झालेले होते. त्या संदर्भात जे कोणी अधिकारी किंवा पदाधिकारी असतील त्यांना इंधन खर्च किंवा वाहन खर्च दयायचा होता. मग असे अधिकारी आहेत की ज्यांना वाहने वेळेवर उपलब्ध होत नसतील तर अशा अधिका-यांना जर वाहने वेळेवर उपलब्ध होत नसतील तर आपण अशा अधिका-यांना सर्वांना वाहन भत्ता दयावा. आपण तो वाहन भत्ता आजपर्यंत दिलेला नाही. आपले दोन ठराव झालेले होते. एक ठराव मा. स्थायी समिती सभा दि. १०/५/२००४ रोजीचे प्रकरण क्र. २३ चा होता. अधिका-यांना स्वतःचे वाहन वापरुन देण्यात येणा-या गाडी भाडयात वाढ करण्यासाठी मंजुरी देणेबाबत होता. तो ठराव प्रभाग समिती क्र. ३० होता. त्याप्रमाणे प्रकरण क्र. ६८ ठराव क्र. ७३ पदाधिकारी यांना वाहन भाडे वाहनाऐवजी अदा करणेबाबत म्हणजे वाहन दिले नाहीतर वाहनाऐवजी भाडे अदा करणेबाबत असा होता. त्याप्रमाणे अधिका-यांना व पदाधिका-यांना ते पैसे दया. म्हणजे आपल्याला मेन्टेनन्सचा खर्च पुढे भविष्यात येणार नाही. त्यांच्या वाहनाची निगा अधिकारी किंवा पदाधिकारी ठेवतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याकडे अशी माहिती आहे की बरेच अधिकारी किंवा पदाधिकारी स्वतःचे वाहन वापरतात. आपण त्यांना सांगितल्याप्रमाणे वाहन भत्ता देतो.

**शशिकांत भोईर :-**

आतापर्यंत काही लोकांना वाहन भत्ता मिळालेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आपल्याकडे जे अधिकारी व पदाधिकारी वाहन वापरतात. आपण त्या सर्वांना वाहन भत्ता देतो. ज्याला वाहन अनुज्ञेय आहे आणि ते मागणी करतात. आपण त्यांना वाहन दिलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

अधिका-यांना वाहन अनुज्ञेय नाही. परंतु, आपण कोणकोणत्या वर्गासाठी वाहन देणार आहोत ते सांगा. कोणकोणत्या अधिका-यांना वाहन देणार आहोत त्याची सुची दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आम्ही ती सुची पुढच्या स्थायी समितीमध्ये सादर करु.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांना वाहन अनुज्ञेय आहे .आपण त्यांना वाहन दिलेले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ज्यांना वाहन अनुज्ञेय नाही ती लोक वाहन मागत आहेत. जी लोक वाहन मागत आहेत आपण त्यांचा विचार करु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आपण पुढच्या सभेमध्ये त्याची माहिती देउया. आपला त्याच्यावर निर्णय होणे अपेक्षित आहे. आपण तो प्रस्ताव पुढच्या सभेमध्ये देउ.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी मागणीचा प्रश्न येत नाही. तुम्ही कुठल्या वर्गाला वाहने देता. तुमचा वाहने देणेबाबत काय नियम आहे ते समजणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आपली जी प्रचलित पध्दत आहे. त्याप्रमाणे् ज्या अधिका-यांकडे वाहने आहेत, ज्या पदाधिका-यांकडे वाहने आहेत. त्यांना अनुज्ञेय वाहन भत्ता दिला जात नाही. प्रचलित पध्दतीमध्ये जे अधिकारी किंवा पदाधिकारी स्वतःचे वाहन वापरतात. आपण त्यांना वाहन भत्ता अनुज्ञेयाप्रमाणे देतो. परंतु, आपण त्या प्रचलित पध्दतीच्या बाहेर जाउन नव्याने पदोन्नती दिलेली आहे. तर त्या काही अधिका-यांची मागणी आहे. आपण ती मागणी मा. आयुक्तांकडे विचाराधीन ठेवलेली आहे. त्याची सुची अंतिम झाल्यानंतर स्थायी समितीला ठेवली जाईल.

**रतन पाटील :-**

त्यांची मागणी कुठल्या वर्गामध्ये आहे?

**जयंत पाटील :-**

त्यांची मागणी अ, ब, क अशा कुठल्या वर्गामध्ये आहे. त्यांची वाहनाबाबतची मागणी 'क' वर्गासाठी आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)साो.) :-**

आपला जो कक्ष आहे किंवा कामाची जी पध्दत आहे. त्याच्यावरुन अधिकारी किंवा पदाधिका-यांना पदावरुन वाहन मिळत नसुन त्यांच्याकडे जे काम आहे. त्याच्यावरुन वाहन अनुज्ञेय होते.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे अशा कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत. आपल्याकडे कर्मचा-यांची लिस्ट आहे. आपण त्यांची कोणती लिस्ट काढलेली आहे? ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपण जे धोरण अंतिम केलेले आहे. आपण त्याच्यासाठी एक कमिटी निश्चित केलेली आहे. उप-आयुक्त, मुख्य लेखाधिकारी, लेखाधिकारी अशा पाच लोकांची कमिटी आहे. आम्ही त्याच्यामध्ये धोरण निश्चित करुन तो प्रस्ताव येत्या स्थायी समितीमध्ये देउ.

**जयंत पाटील :-**

साहेब, हा दि. १०/६/२००४ च्या स्थायी समितीला आलेला निर्णय आहे. आज या गोष्टीला दोन वर्षे झाली तरी तुम्ही धोरणात्मक निर्णय बोलता का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे सर्वांना वाहन अनुज्ञेय आहे. कोणाला वाहन अनुज्ञेय नाही असे नाही. जे नव्याने एक वर्षा नंतर जी पदोन्नती दिलेली आहे अशा अधिका-यांची वाहनाबाबत मागणी आहे. सन २००० पासून कोणालाही वाहन मिळालेले नाही अशी आपल्याकडे परिस्थिती नाही.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी वाहन मागणीमध्ये दोन त-हा आहेत. एक नवीन मागणी मागितलेली आहे. त्याबाबत मला असे वाटते की आम्हाला एका अधिका-याकडून असे समजते की तुम्ही वाहन देतात त्यांना ते वाहन वेळेवर मिळत नाहीत. तुम्ही घेतलेली सर्व वाहने नादुरुस्त आहेत अशी परिस्थिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

अशी परिस्थिती कोणाचीही नाही.

**शशिकांत भोईर :-**

आमच्या निदर्शनास अशी परिस्थिती आहे. म्हणून मी तुम्हाला बोललो. मी तुम्हाला तसा खुलासा केलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आमच्याकडे तशी कोणाचीही तक्रार नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला ठेकेदार जी वाहने उपलब्ध करुन देतो. ती वाहने वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्या ठेकेदाराची वाहने वेळेवर पोहोचू शकत नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

जर तुमच्याकडे तशी तक्रार असेल तर तुम्ही चर्चा करु शकता. परंतु, माझ्याकडे तशी तक्रार नाही.

**शशिकांत भोईर :-**

आम्हाला चर्चा करायची नाही. आमच्याकडे याबाबतची माहिती आहे म्हणून आम्ही तुम्हाला सांगितले. तुम्ही अशा कोणकोणत्या लोकांना वाहने दयायची आहेत आणि कोणकोणत्या लोकांना वाहने दयायची नाहीत याची सुची बनवा. त्याच्यामध्ये ज्यांना वाहने देण्याची परिस्थिती असेल त्यांना वाहने दया आणि ज्यांना वाहने देण्याची परिस्थिती नसेल तर वाहन भत्ता देउन त्यांनी त्यांची व्यवस्था करायची आहे. त्यांना वेळेवर कुठेही जाण्यासाठी वाहन उपलब्ध रहायला पाहिजे. त्यांना वाहनाची वाट बघता कामा नये. वाहन वेळेवर उपलब्ध व्हायला पाहिजे. याबाबत तुम्ही दक्षता घ्यायला पाहिजे असा निर्देश अधिका-यांना दया.

**रोहिदास पाटील :-**

मग आपण वाहन भत्ता कशाला दयायचा?

**शशिकांत भोईर :-**

ती संबंधित अधिका-यांची जबाबदारी आहे. आपण त्यांना मानधन दयायचे आहे किंवा त्यांना वाहन भत्ता दयायचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

सचिवांनासुध्दा वाहन दिले. तेसुध्दा याच्यामध्ये येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपण वाहन भत्ता दिला तर त्या अधिका-यांनी ते वाहन वापरायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही तसे नमुद करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता सगळे अधिकारी विचारतात. मीसुध्दा विचारतो की आपल्या मा. सभापतींना वाहन आहे का? त्यांनी मागच्यावेळेला सांगितलेले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपण या ठिकाणी फक्त चर्चा करुया.

**शशिकांत भोईर :-**

आता जे सेम मॅटर आहे. ज्यांना इंधन वापरायचे आहेत. तेसुध्दा त्याच्यामध्ये आलेले आहे. ते प्रत्येकी वेगवेगळे येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

सन्मा. सदस्य भोईर साहेब, मी तुम्हाला खुलास करतो की वास्तविक या ठिकाणी एवढे डिटेल हेड देण्याची गरज नव्हती. परंतु, आम्ही मुददाम दिलेले आहे. आम्ही हे वाहन मुददाम दिलेले आहे. हे वाहन विभाग अंर्तगत होत आहे. हे दुस-या विभागाचे हेड नाहीत.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १२६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मागच्या सभापतींची गाडी कुठे गेली?

**शशिकांत भोईर :-**

मागच्या सभापतींची गाडी कुठे गेली?

**रोहिदास पाटील :-**

आम्ही जे बोलतो ते तुम्ही मनावर घेता का?

**जयंत पाटील :-**

मागच्या सभापतींची गाडी कुठे गेली?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

मी याबाबत सभागृहाला खुलासा करु इच्छितो की मागच्या मा. सभागृहाने सभापतींच्या मंजुरीने आम्ही ती गाडी प्रभाग समिती मिरा रोड यांना दिलेली आहे. आम्ही आता त्यांच्या नावाने ही गाडी घेउन सभापतींना त्यांची गाडी उपलब्ध करून देणार आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

ती गाडी किती दिवसात येईल ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

ती गाडी १५ दिवसांत येईल.

**जेन्वी आल्मेडा :-**

तुम्ही ती गाडी लवकरात लवकर आणा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

मी मागच्या सभापतींना गाडी देउ केलेली होती. परंतु, ते बोलतात की मी स्वतःची गाडी वापरतो.

**जयंत पाटील :-**

हा त्यांचा मोठेपणा आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही सभापतींचे म्हणणे व्यवस्थित ऐकून घ्या आणि ते म्हणणे रेकॉर्डवर येउ दया.

**मा. सभापती सो. :-**

जर तुम्ही ती गाडी दुस-याला देण्या पेक्षा मला दिली असती तर मी ती गाडी वापरली असती.

**जयंत पाटील :-**

खरे म्हणजे आजपर्यंत मा. सभापतीसाहेबांनी गाडीबाबत मागणी केलेली नाही. आम्ही आता मागणी करतो.

**मा. सभापती सो. :-**

मी गाडीबाबत मागणी सुद्धा केलेली नाही.

**जयंत पाटील :-**

स्थायी समितीचे सभापती स्थायी समितीच्या गाडीतून जायला पाहिजेत असे आमचे मत आहे. आम्ही कोणाचे नांव घेत नाही. परंतु, पूर्वीच्या ज्या गाडया होत्या. त्या गाडया संध्याकाळी ५.०० किंवा ६.०० वाजल्यानंतर फिरल्या तर गोष्ट वेगळी आहे. परंतु, आम्ही शहरामध्ये रात्री २.०० वाजेपर्यंत गाडया फिरताना बघितलेल्या आहेत. नको त्या ठिकाणी गाडया पोहोचलेल्या आहेत. त्या गाडयांचा दुरुपयोग झालेला आहे. मी हे सिध्द करुन देईन. मी जनरल बोलतो. मी मुंबईवरुन येताना मला एक गाडी रस्त्यात दिसली होती. ती गाडी गोरेगावच्या आसपास दिसली होती. मी सिग्नलवर थांबलो तर बाजुला गाडी उभी होती. मी त्यांना कुठे चालले असे विचारले तर ते बोलले की साहेबांच्या मुलीला एयरपोर्टला सोडायला गेलेलो होतो. ती महापालिकेची गाडी होती. त्यावेळेला रात्रीचे जवळजवळ ९.३० ते १०.०० वाजलेले होते. त्या गाडया महापालिकेच्या पदाधिका-यांना मिळणार आहेत. त्याचा असा दुरुपयोग करावा का? त्याचे काही नियम बनविलेले आहेत का? त्याचे काय नियम आहेत? ते सांगा.

**मा. सभापती सो. :-**

त्याला नियम आहेत.

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला एक उदाहरण देईन की वसई नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री. मायकल फुटॅरो फक्त नगरपालिकेच्या कामासाठी गाडी वापरायचे. हा याच्यामधून बोध घेण्यासारखा विषय आहे. त्यांनी मी महापालिकेच्या गाडीतून जात नाही असे सांगितलेले होते. त्यांच्याकडे स्वतःची गाडी नव्हती. परंतु, ते महापालिकेच्या कामासाठी ठाण्याला जात असत तरच ते ती गाडी घेउन जायचे. असे लोक दुर्मिळ आहेत. त्यांना गाडी मिळायला पाहिजे. कारण ते एक स्टेटस आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

मा. सभापतींना नवीन गाडी उपलब्ध करुन दिली जाईल.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांना चांगली गाडी पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, मी अशी अपेक्षा करतो किंवा आम्ही जे बोलतो ते असे आहे की मागच्या वेळेला मोठा प्रसंग घडलेला होता. हायवेवरिल लक्ष्मीबागचे पाणी काढायचे आहे असे आपण निवेदन केलेले होते. तुम्ही मिरा गावचे पाणी काढण्याचे निवेदन केले. पंरतु, त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. आता पाउस गेल्यानंतर नाले खणायला पाहिजेत. तुम्ही त्याचे काहीतरी इम्प्लिमेन्टेशन करा. हे काम झाले म्हणून आम्ही तुम्हाला प्रभाग सभेत धन्यवाद देतो. आता तो हॉटेलवाला पुन्हा तिथे भरणी करेल, ते पुन्हा लक्ष्मीबागवाले महापालिकेत येतील आणि पुन्हा आरडाओरड होईल.

**मा. सभापती सो. :-**

तुम्ही त्याचा शहानिशा करुन जे काम करायचे आहे ते करा आणि त्या कामाची पुर्तता करुन ठेवा.

**फॅरो ग्रिटा :-**

आता कामांना सुरुवात करा.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपण शाळेच्या मैदानासंबंधी विषय घेतलेला आहे. शाळेचे मैदान देण्याचे अधिकार फक्त स्थायी समितीला आहेत की शिक्षण मंडळाला आहेत ते प्रथम सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

ती महापालिकेची मालकी आहे. त्या ठिकाणच्या प्रशासकीय कामकाजाचे नियंत्रण शिक्षण मंडळाला करायचे आहे. ज्या स्थावर मालमत्ता आहेत. आपल्याला त्याचा निर्णय घ्यायचे अधिकार आहेत.

**जयंत पाटील :-**

मनपाच्या शिक्षण मंडळामध्ये दि. ९/६/२००६ रोजी ठराव झालेला होता. मी तुम्हाला तो ठराव वाचून दाखवतो. (दि. ९/६/२००६ च्या ठरावाचे वाचन केले.) शिक्षण मंडळाने हा ठराव केलेला होता. या ठरावाचे सुचक श्री. नरेन्द्र पाटील होते आणि अनुमोदक श्री. एकनाथ पाटील होते. ही प्रॉपर्टी कोणाची आहे ते सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणून कार्यवाही करतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हे नजरचुकीने करायला लावू नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

खरे म्हणजे असे व्हायला नको होते.

**शशिकांत भोईर :-**

माझी या विषया संबंधात अशी सुचना आहे की आपण आता जे नविन विषय पटलावर घेतलेला आहे. स्विकृत सदस्य शिक्षण मंडळावर घेतलेले आहे तर त्यांना प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, हयाची नोंद करुन घ्या आणि कळवा.

**शशिकांत भोईर:-**

मा. सभापतीसाहेब, माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की आपण महापालिकेमध्ये बरेच विभाग काढलेले आहेत. शिक्षण मंडळ, शिक्षण समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, विधी विभाग अशा ब-याच समित्या आहेत. त्या समित्यांचे काय कार्य आहे? आपण कोणते कार्य करु शकतो त्याबाबत येथील लोकांना आशा आहे. नगरसेवका व्यतिरिक्त अन्य दुस-या स्थानिक स्वराज्य संस्थेतून किंवा अन्य कुठल्याही संस्थेतून असे पदाधिकारी घेतलेले आहेत. आपण काय करायचे आहे? ही अशा लोकांना आपली जाण माहिती नाही. आपले ठराव होतात. आपण अशा लोकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. खासकरुन प्रशिक्षण शिबिर नेमून दिले तर त्यांनासुध्दा आपले पदाधिकारी काय आहेत ते कळेल. माझी मा. सभापतींना सुचना आहे की तुम्ही हयाच्यावर लवकरात लवकर कार्यवाही करावी. जेणेकरुन आपले अधिकार काय आहेत? ते त्यांना माहिती पडेल. कारण आज जेवढया समित्या स्थापन केलेल्या आहेत. त्यांना नक्की फन्ड खर्च करायचा आहे

की नाही की स्थायी समितीने खर्च करायचा आहे ते सुद्धा माहिती नाही. आपण हया समित्या स्थापन करुन त्यांना गाडया देणार आहोत. आपण स्टाफ देणार आहोत. त्याचा दुरुपयोग होणार आहे. कारण त्यांना अधिकार नसेल तर काय उपयोग आहे? आपण हे कशाला स्थापन केले की जेणेकरुन लोकांची जी कामे असतील ती लवकरात लवकर पूर्ण होतील. या मिरा भाईंदरचा विकास होईल. नागरिकांच्या समस्या हल होतील. मी तुम्हाला त्याबाबतीत विनंती करतो की आम्ही त्या समित्यांमध्ये जाउन प्रशिक्षण घेउ. उदया दुसरी लोकसुध्दा प्रशिक्षण घ्यायला येतील. आम्ही लवकरात लवकर प्रशिक्षण घेउ.

**मा. सभापती साो. :-**

मी याबाबत श्री. खतगांवकरसाहेबांना सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, सार्वजनिक बांधकाम विभाग जे काम करतो. आपण त्या कामाबाबत वेगवेगळया ठेकेदारांना टेन्डर देतो. हे टेन्डर देण्यापूर्वी बांधकाम विभागाची काहीही चुक नसते. जर आपण ठेकेदाराला टेन्डर दिले तर तो ठेकेदार काम पूर्ण करेल. माझ्याकडे शांती नगर सेक्टर नं. ५ मधील काम आहे. जुलै २००५ मध्ये हे गटार वाहत गेलेले आहे. आम्ही वेस्टला होतो. आज जुलै २००६ गेला. परंतु, कामाला सुरुवात केलेली नाही. तो ठेकेदार बांधत नाही की काय कारण आहे ते सांगा. त्याच्यामध्ये त्या लोकांचा काय दोष आहे?

**मा. सभापती साो. :-**

तो ठेकेदार कोण आहे?

**रोहिदास पाटील :-**

माहित नाही कोण ठेकेदार आहे त्याची माहिती घ्या आणि प्रथम काम पूर्ण करा.

**मा. सभापती साो. :-**

तुम्ही काम बघुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मेन मार्केटचे गटार सन २००५ रोजी केलेले होते. महापालिकेने ते गटार तोडले. त्याचे पाणी अजुनपर्यंत सुकलेले नाही. त्याच्यामुळे व्यापारी व नागरिकांना खुप त्रास सहन करावा लागतो. दोन-तीन महिन्याचा लेट झालो तर वेगळी गोष्ट आहे. परंतु, आम्ही ही बाब सांगून दिड वर्ष झालेले आहे.

**मा. सभापती साो. :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १२६ :-**

मा. आयुक्त साो. यांनी निविदा मागविण्यास दिलेल्या मंजुरीला आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.

महानगरपालिका मालकीच्या वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामाची निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वाहनांसाठी लागणारे स्पेअरपार्ट पुरवठा करणे व दुरुस्ती करीता यापुर्वी सन २००५-०६ करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या व या मंजुर निविदेच्या दराने महानगपालिका वाहनांची कामे केली जात आहेत. सदर निविदेची मुदत ऑक्टोबर २४/१०/२००६ रोजी संपत असुन नविन निविदेची कार्यवाही करुन प्रत्यक्ष नविन ठेकेदाराची नेमणुक करणे करीता लागणारा कालावधी लक्षात घेता सन २००६-०७ करीता निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर निविदेकरिता लहान व मोठी वाहने दुरुस्ती करिता खालीलप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुद असुन शिल्लक तरतुद खालीलप्रमाणे आहे.

**लहान वाहनांकरीता**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | एकुण तरतुद | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन (११) पेट्रोल, इंधन वंगण व वाहन दुरूस्ती | ५०,००,०००/- | १६,८४,१४८/- |
| २ | इतर कर ६ पेट्रोल इंधन व वाहन दुरूस्ती | ७,००,०००/- | ५,००,५२५/- |
| ३ | (१) अग्निशमन (४) वाहन इंधन व निगा | १२,००,०००/- | ८,०६,४४१/- |
| ४ | प्रा/माध्यमिक शिक्षण (६) वाहन दुरूस्ती इंधन | १,००,०००/- | ७७,६४१/- |
| ५ | महसुली खर्च पाणीपुरवठा (१५) वाहन इंधन भाडे निगा | ४,००,०००/- | ३,४३,३४५/- |
| | | | **३४,१२,१००/-** |

**मोठया वाहनांकरीता**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | एकुण तरतुद | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|
| १ | (१) अग्निशमन (४) वाहन इंधन व निगा | १२,००,०००/- | ८,०६,४४१/- |
| २ | (क) १ साफसफाई व सोयी (७) मनपाच्या | १०,००,०००/- | १,९३,०२१/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | मालकीचे डंपर/जेसीबी पोकलन दुरूस्ती व निगा | | |
| ३ | क(१) आरोग्य व सोयी साफसफाई १२ इंधन व वाहन दुरूस्ती | ३०,००,०००/- | १३,९३,२५०/- |
| ४ | २ रूग्णालये व दवाखाने वाहने इंधन व दुरूस्ती | २५,००,०००/- | १५,८५,६२४/- |
| | | | **३९,७८,३३६/-** |

**पुर्नविनियोजन पत्रक**

**नमुना क्र. १० नियम ३० (३) पहा**

| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | मुळ अनुदान | आज तारखेपर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | संकिर्ण फ (५) मालमत्ता विमा रक्कम | २०,००,०००/- | १,१४,३६८/- | १७,८५,६३२/- |

| अ.क्र. | प्रधान, गौण, व तपशिलवार शिर्ष | मुळ अनुदान | आज तारखेपर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** |
| २ | अ सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च (४) नविन वाहन खरेदी | ४०,००,०००/- | ३३,६३,४५२ | ४,५०,०००/- | मा. अध्यक्षा प्रभाग समिती क्र. ४ यांचेकरिता नविन वाहन खरेदी. |

वरील तरतुदी मधुन वाहनांचा दुरुस्ती खर्च उक्त लेखाशिर्षा अंतर्गत केला जाणार आहे. तरी सदर कामी सन २००६-०७ या वर्षाकरीता महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी वार्षिक निविदा मागविणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच वाहन विभाग अंतर्गत उपलब्ध तरतुद व पुर्न नियोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन मा. अध्यक्ष प्रभाग समिती क्र. ४ यांच्याकरीता मारुती बलेनो ज्क्ष ही गाडी खरेदी करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १२७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. १२७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या गोषवा-यामध्ये निविदा ५० टक्के नमुद केलेली आहे. श्री. खांबितसाहेब, या ठिकाणी असा विषय आहे की अंदाजपत्रकीय दराची निविदा ५० टक्के अबाउ आलेली आहे. त्याच्यानंतर श्री. गिरीश आर्किटेक्ट यांनी ३४ टक्के सांगितलेले होते. म्हणजे नक्की काय आहे? या ठिकाणी ५० टक्केची निविदा आहे की ३४ टक्केची निविदा आहे. आपण निविदा किती भरायची आहे? तुम्ही तुमच्या सिटी इंजिनियर व एग्झिक्युटिव्हचे मत नमुद केलेले नाही. तुम्ही आमच्यावर ढकलत आहात. वरिल वसुली पाहता निर्णय होण्याची शिफारस आहे. आम्ही ३४ टक्के दराने निविदा पास केली तर उदया ऑडिटरचे ऑब्जेक्शन निघाले किंवा क्वेरी निघाले तर आम्ही त्याला १६ जण जबाबदार राहणार नाही. तुम्ही निविदा ५० टक्के असावी असे बोलता आणि एकदा ३४ टक्के निविदा असावी असे बोलता.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ३४ टक्के दरांनी निविदा आणली तर तुम्ही ती निविदा नव्या रेटने आणा. तुम्ही तुमच्या मताने निविदा आणा. आम्ही चांगल्या कामाला होय बोलतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला निविदा मंजुर करायची आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही नवीन डी.आय.आर. तर्फे त्यांची निविदा काढा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला निविदा मंजुरीचे काम करणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याला निविदा मंजुरीचे काम पुढे गरजेचे आहे. परंतु, हे शहराच्या दृष्टिने चांगले काम आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबितसाहेब, तुम्ही कोणतीही कागदपत्रे घेउन येता तेव्हा आम्ही बोलतो का?

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांच्या दालनात चर्चा झालेली होती. चर्चे अंति अशी बोलणी झाली की आपण हयांची निविदा नवीन डी.एस.आय प्रमाणे निविदा काढावी. त्यामुळे पुढिल सभेत विषय घ्यावा. म्हणजे विषय लगेच झटक्यात पास होउन जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, निविदा मंजुरीचे काम अतिशय महत्वाचे व गरजेचे आहे. निविदा मंजुरीचे काम करणे आवश्यक आहे. निविदा मंजुरीचे काम लवकरात लवकर झाले पाहिजे. तुम्ही निविदा मंजुरीच्या कामाला वेळ लावू नका. तुम्ही तुमच्या निविदा तीन-तीन वेळा रिकॉल करता हे योग्य नाही.

**रोहिदास पाटील :-**

मग तुम्ही आपल्या महापालिकेचे सर्व काम रिकॉलने चालवा.

**हंसुकुमार पांडे :-**

निविदा मंजुरीचे काम होणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आता निविदा मंजुर केल्या तर तुम्हाला ऑडिटमध्ये अडचण येणार नाही. लोकांचा वेगळा मॅसेज जाणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की आता डी.एस.आय वाढलेले आहेत. त्यामुळे मालाचे भावसुध्दा वाढलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आताचे हे डी.एस.आय. कधीचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही निविदा ५० टक्के अबाउने दयायचे बोला आणि दुसरी गोष्ट म्हणजे शहरामध्ये वेगळा मॅसेज जाता कामा नये.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आताच्या चर्चेप्रमाणे कम्पेअर केले तर किती येतो?

**रोहिदास पाटील :-**

आपल्या दोन गाडया आहेत.

**हंसुकुमार पांडे :-**

सध्या पुष्कळ वेळ झालेला आहे आणि सगळे काम थांबलेले आहे. आपल्याला त्यासाठी थोडा वेळ पाहिजे. तुम्ही निविदा मंजुरीचे काम करुन टाका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपण हया निविदा तीन वेळा मागितलेल्या होत्या.

**शशिकांत भोईर :-**

हया निविदा तीन वेळा रिकॉल झालेल्या आहेत. त्यामुळे डी.एस.आय. ऑक्टोबरमध्ये नवीन आलेला आहे, ज्यादा भाव वाढवून आलेला आहे. तोही आजच्या बाजार भाव मुल्यापेक्षा तुलनात्मक आहे.

**मा. सभापती सो. :-**

आपण नवीन निविदा मागितली तर काम होउ शकेल.

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की जर आपल्या अधिकारात किंवा आपल्या नियमात असेल तर आपण त्याच्यामध्ये आजच्या बाजारभावाप्रमाणे डी.एस.आय. नवीन घेउ. कारण आपल्याला या ठिकाणी बिल्डिंग बांधायची आहे. आपल्याला गटार बांधायचे नाही. आपले हे कायमचे स्ट्रक्चर आहे. आपल्याला हे स्ट्रक्चर चांगले करायचे आहे. त्या अनुषंगाने आपण नवीन डी.एस.आय. लावून त्याच्यामध्ये काही वाढीव मुदत असेल तर ज्याला वाढीव किंवा जास्त दराने निविदा दयायची असेल तर आपल्याकडे तीन निविदा आलेल्या आहेत. आपण तीन निविदांमध्ये ५० टक्के अबाउ केलेले आहे. ते संपूर्ण जुन्या डी.एस.आय. प्रमाणे दिलेले

आहे. नवीन डी.एस.आय.प्रमाणे दिलेले नाही. तुम्ही या ठिकाणी अशी तुलना करा की नवीन डी.एस.आय.चा भाव हयाची निविदा न मागवता त्याच्यामध्ये बसवा. जो ठेकेदार असेल त्याला ते समजावून सांगा.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला नियमानुसार जी कार्यवाही करता येईल ती करा. परंतु, सगळयाच निविदा अबाउ घेउ नका.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे एकूण किती निविदा आहे? माझ्या माहितीनुसार सगळया निविदांची मुदत वाढलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण हयाला विरोध करत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी माझे स्वतःचे मत सांगतो. आमच्या एका माणसाने शाळेचे ७.५ लाख बिल आहे तरी त्याच्यामध्ये रु. १२ लाख खर्च केलेले होते. त्यामुळे हयाच्यापेक्षा अबाउ निविदा काढल्याशिवाय जमत नाही. कारण तो बांधकामाचा विषय आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, हयाच्यामध्ये चुक कोणाची आहे? आपण निविदा मंजुर करतो. मग आपल्या चुका आहेत की त्यांच्या चुका आहेत? नक्की कोणाच्या चुका आहेत? ते सांगा. जर उदया सेन्ट्रल ऑडिटला आक्षेप घेतला तर हयाच्यामध्ये कोणी राहणार नाही, प्रॉब्लेम निर्माण होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याबाबत आपले सिटी इंजिनियर आणि आपल्या ऑडिटरनी खुलासा करावा. दोघांनी खुलासा करावा.

**रतन पाटील :-**

हे शहराच्या दृष्टिने एक चांगले काम आहे. त्यामुळे कोणाची कधी ना नाही.

**शशिकांत भोईर :-**

निविदा मंजुरीचे काम होणे आवश्यक आहे. त्याबाबत टेक्निकल प्रॉब्लेम असेल तर निवेदन करावे.

**मा. सभापती सो. :-**

मग त्यावेळेला पास कसे झाले नाही? तुम्ही माझ्याकडून पास का करुन घेता? हे तिकडून पास करण्यासाठी आलेले आहे. इकडून पास कसे झालेले नाही? कदाचित, निविदा अबाउ मिळालेली नाही. म्हणून पास झालेले नसेल. आपल्याला निविदा अबाउ मिळाली पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

याबाबत सिटी इंजिनियरसाहेबांनी खुलासा केला तर बरे होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सिटी इंजिनियरसाहेब किंवा ऑडिटरसाहेब या दोघांनी निविदा ५० टक्के घ्यायची की ३४ टक्के घ्यायची याचा खुलासा करावा. म्हणजे डी.एस.आय. रेट काय आहेत आणि मार्केट रेट काय आहेत त्याचा खुलासा करावा. आपण तशी मंजुरी देउ.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

या ठिकाणी खुलासा करण्याची गरज नाही. ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे निविदा ५० टक्के अबाउ आलेली आहे आणि नवीन डी.एस.आय. प्रमाणे टॅली केले तर ते ३४ टक्के होतात असे आपण गोषवा-यामध्ये दिलेले आहे आणि तीन वेळा निविदा काढल्या तर ५० टक्के अबाउ आलेल्या आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर अंदाजपत्रकातील चालु बाजार भावाप्रमाणे दर घेउन तुलना केली असता सदर निविदा ३४ टक्केप्रमाणे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आजच्या रेटप्रमाणे कम्पेअर केले तर सदर निविदा ३४ टक्केप्रमाणे होउ शकते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा चालू बाजार भावाचा रेट आहे. डी.एस.आय.चा रेट वेगळा आहे. डी.एस.आय. रेट त्याचा स्वतःचा नसतो आणि बाजार भावाचा रेट त्याचा स्वतःचा असतो.

**शशिकांत भोईर :-**

डी.एस.आय.चा रेट आणि बाजारभावाच्या रेटमध्ये फरक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दोन्हीमध्ये फरक नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपल्याला बाजारभावाचे कम्पॅरिझन करता येत नाही.

**दिपक खांबित :-**

बाजार भाव काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

डी.एस.आय. म्हणजे जिल्हा दरसुची म्हणायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

जे मटेरियलचे भाव आहेत. ते बाजारभाव दरसुचीप्रमाणेच होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तांत्रिक सल्लागारांनी चालु बाजारभावाप्रमाणे उत्तर दिलेले आहे. माझ्याकडे हे डी.एस.आय.चे पत्र आहे.

**शशिकांत भोईर :-**

चालु बाजारभाव डी.एस.आय.प्रमाणे आहे.

**दिपक खांबित :-**

चालु बाजार भाव म्हणजे सध्याचे बाजारभाव.

**शशिकांत भोईर :-**

चालु बाजारभाव म्हणजे आता जे भाव चालू आहेत त्या भावाप्रमाणे निविदा मंजुर करायची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

हयांचे आता जे रेट आहेत त्या रेटने निविदा मंजुर करायची आहे.

**दिपक खांबित :-**

सध्याचे सिमेन्टचे रेट रु. १३५/- आहेत.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, त्याचे बाजार मुल्य रु. २४०/- आहे.

**मा. सभापती सो. :-**

त्याचे बाजार मुल्य रु. २२०/- आहे.

**शशिकांत भोईर :-**

ती लोक जसे देतात तसे बाजारमुल्य आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

या ठिकाणी हा फरक आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण हयांना सुविधा दयायची.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

तुमच्या लक्षात येते का? आपल्याला हया सर्व गोष्टी समजावून घ्याव्या लागतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपले टेन्डर रिकॉल झालेले नाही. मग तुम्ही ॲनासिस करा. तुम्ही आम्हाला आता हया बाजार भावानुसार बोलले. त्याप्रमाणे सिटी इंजिनियरने रिमार्क करावा आणि त्याच्यामध्ये डी.एस.आय. चा जो नवीन रेट आहे. त्याच्यामध्ये किती टक्के अबाउ असेल ते तुम्ही लिहा.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, आपण सिटी इंजिनियरचे मत मागितले तर बरे होईल.

**जयंत पाटील :-**

अंदाजित रक्कमेमध्ये एवढा फरक येत असेल तर रु. १ कोटीचा फरक आहे. मग ही चुक कोणाची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

ही चुक नाही. ज्यावेळेला हे एस्टिमेट तयार केले होते. ते अंदाजपत्रक त्यावेळेच्या मंजुर डी.एस.आय. च्या रेटप्रमाणे तयार केले जाते. हा प्रस्ताव कधीचा आहे. हे एस्टिमेट रेट त्यावेळेचे आहेत. त्याच्यामध्ये चुक नाही. हे रेट मे महिन्यातील आहेत.

**जयंत पाटील :-**

आजपर्यंत एवढे रेट वाढलेले होते का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

हे रेट एक वर्षाचे आहेत.

**जयंत पाटील :-**

हे दि. १८/५/२००६ चे रेट आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

हयाचा डी.एस.आर फिक्स असतो. डी.एस.आय. बंद झाला तर आपल्याला समजुन घेता येते.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, आपल्या ट्रकमधून फेब्रुवारी, मार्च महिन्यापासून जास्त माल वाहुन नेण्याचा जो प्रॉब्लेम निघालेला होता. त्याच्यामुळे डी.एस.आय.च्या रेटमध्ये फरक पडलेला नाही. डी.एस.आय. चे भाव तेवढेच राहिलेले आहेत. फक्त त्याच्यामध्ये बाजार मुल्य वाढलेले आहे. वजन लोडिंगची गाडी लगेच वजन घट वगैरे झाले आणि ९ टन माल जायला पाहिजे असे सांगायचे. क्वान्टिटीमुळे बाजार मुल्य वाढले. डी.एस.आय. ४० टक्के अबाउ जायला पाहिजे होता आणि तो डी.एस.आय. १०० टक्के रहायला पाहिजे. त्याचा जुना रेट तोच रहायला पाहिजे म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की मी ठराव वाचतो. तुम्ही हयाच्यावर पुन्हा विचार करुन मंजुर करुन घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

जर १५ दिवसात सर्व काही व्यवस्थित होत असेल तर तुम्ही प्रशासनाला अडचणीत कशाला आणता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही दोन वेळा सांगितले की सिटी इंजिनियर व ऑडिटरने खुलासा करावा. परंतु, दोघे खुलासा करत नाही. हयाचा काय अर्थ आहे?

**जयंत पाटील :-**

जर हयांना कळत नसेल तर हयांना कशाला ठेवलेले आहे?

**रोहिदास पाटील :-**

हे काही गटार बनवायचे काम नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही गटार बनवायचे एस्टिमेट काढता. तुम्ही ते एस्टिमेट रु.५० लाख ते रु. १ करोडचे काढता. मग फरक का पडत नाही? मग ती लोक त्या पैशामध्ये कशी कामे करतात? ते लोक लोखंड आणतात, सिमेन्ट आणतात. ते लोक त्या ट्रकमधून सर्व माल आणतात. त्यांना डी.एस.आय. परवडतो. शाळा बांधली किंवा इतर गोष्टी बांधल्या तर त्यावेळेला निविदा ५० टक्के अबाउ कधीही झालेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

ही ५० टक्के अबाउ केलेली निविदा म्हणजे महापालिकेच्या खर्चाची बाजु आहे. ते पत्रकार बघणार नाही. तुमच्या सचिवालयातील कोणी अधिकारी बघणार नाही. ते विश्लेषण तुम्ही तिथे देउ शकत नाही. तुम्ही ५० टक्क्यांनी निविदा दिली तर लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. माझी या ठिकाणी अशी विनंती आहे की १५ दिवस थांबा, निविदा नीट बसवा. रु. २ कोटी ते रु. अडीच कोटीचा फरक पडत नाही. परंतु, ते नियमात बसवा.

**मा. सभापती सो. :-**

याबाबत सिटी इंजिनियरने खुलासा करावा.

**मिलिंद वाणी :-**

या निविदे संदर्भात जे एस्टिमेट केलेले होते. ते श्री. गिरिश प्रधान जे आर्किटेक्ट आहेत. त्यांनी केलेले होते. आपण त्यांच्याकडून केलेले होते. त्याच्यानंतर जेवढया निविदा मागवल्या तेवढया निविदा तीन वेळा कॉल करुन मिळाल्या नाहीत. चौथ्यांदा ५४ टक्के अबाउ निविदा आली. आपण त्याच्यामध्ये पुन्हा निविदा कॉल केली आणि पाचव्यांदा निविदा आल्यानंतर वाटाघाटीनंतर ५२ टक्केची निविदा दिल्यानंतर त्यांनी ५० टक्के अबाउची निविदा कॉल केली. त्याबददल स्थायी समितीने निर्णय घ्यायचा आहे. आपण टिपणीमध्ये म्हटलेले आहे की सिमेंटचे दर वाढलेले आहेत. त्यानुसार ती निविदा अबाउने दयायची की बिलोने दयायची तो निर्णय घ्यायला स्थायी समिती सक्षम असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्ही सक्षम आहोत. तुम्ही टेक्निकल परसन आहात. तुम्ही सिटी इंजिनियर आहात. हे रेट फिजीबल आहेत की नाहीत ते तुम्ही सांगा. आपण ही निविदा किती परसेन्ट अबाउने दिली पाहिजे ते सांगा. मी त्याच्यामध्ये टेक्निकल परसन नाही. तुम्ही एकटे आहात. तुम्ही ऑडिटर आहात. तुम्ही हयाच्यामध्ये सांगा की ही निविदा कधी पास केली आणि उदया ऑडिट ऑब्जेक्शन निघाले तर सिटी इंजिनियर, ऑडिटर व प्रशासन हयाला जबाबदार आहेत.

**शशिकांत भोईर :-**

हा निर्णय स्थायी समितीने घ्यायचा आहे. स्थायी समिती निर्णय घेत असते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आम्हाला स्थायी समितीच्या कामकाजात अडचणीत कशाला आणता?

**रतन पाटील :-**

आम्हाला अडचणीत कशाला आणता?

**रोहिदास पाटील :-**

त्यांना विश्वास वाटतो. तुम्ही आम्हाला एकदा संधी दिली की आम्ही पुन्हा-पुन्हा बोलणार नाही. नाहीतर आम्हाला प्रत्येक वेळेला संशय येत जाईल. त्यापेक्षा जर रितसर होत असेल किंवा १५ दिवसात चांगले होत असेल तर ते १५ दिवसांनंतर करा असे मी मत मांडतो.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी विरोध करण्याचे काहीही कारण नाही.

**रतन पाटील :-**

विरोध करण्याचे काहीही कारण नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही १५ दिवसांनंतर विषय आणा. १५ दिवसानंतर विषय आणला तर काहीही बिघडणार नाही. परंतु, उगीच सभागृहाला अडचणीत आणू नका.

**रतन पाटील :-**

तुम्ही आठ दिवसात विषय आणा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आठ दिवसात विषय आणा.

**रतन पाटील :-**

तुम्ही यासाठी विशेष सभा लावा.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे जे रु. २ कोटी ४ लाख आहेत. त्याऐवजी रु. ३ करोड आणा. आम्हाला मंजुर आहे. आज रु. ५० टक्क्याने भरतात. मग ५० टक्के वाढीव होणार नाही. तुमचे एस्टिमेट बरोबर नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही परफेक्ट एस्टिमेट दया.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी ५० टक्के अबाउ निविदा आल्यामुळे प्रॉब्लेम होतो.

**रोहिदास पाटील :-**

हया सभागृहाने अबाउ ५० टक्केच्या टेन्डरला मंजुरी दिली म्हणजे ते जास्तीच्या कामाची स्तुती करणार आहेत. परंतु, आताची सिस्टिम खोटी आहे. अडचणीत येणारी आहे. हयाच्यामुळे सगळयांना अडचण आहे.

**रतन पाटील :-**

सगळयांना अडचण होणार आहे. उदया सगळे नागरिक भरपूर आक्षेप घेतील.

**रोहिदास पाटील :-**

आपण निविदेला मंजुरी देण्याची टिपणी बनवायची आणि याबाबत ऑडिटर व लेखापाल या सर्वांनी निर्णय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबितसाहेब, तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला घ्या. आम्ही कामाला विरोध करत नाही. मी चांगल्या दृष्टिने सांगतो. तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये चांगला डिसीजन घ्या. आपण एस्टिमेटला विरोध करत नाही. परंतु, ५० टक्के अबाउने निविदा देण्याबाबत नक्की विरोध करतो. तुम्ही त्याच्यामध्ये समन्वय म्हणून आठ दिवस थांबा. तुम्ही रितसर बसुन विषय आणा आणि तो ठराव मंजुर करुन घ्या. हे एक चांगले काम आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

१०-१५ टक्के वाढवा. आपले तसे कॅल्क्युलेशन होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपण प्रेझेन्ट नियमाप्रमाणे टॅली करायचे आणि निविदा किती अबाउ आहे ते बघायचे. आपल्याला त्याच्यामध्ये निविदा बसवायची आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ७-८ मध्ये बसवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठिकाणी पुन्हा डी.एस.आय. चा रेट आलेला आहे. हे जे एस्टिमेट बनवलेले आहे तो डी.एस.आय.चा रेट आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

आपल्याला बाजार मुल्याचा विचार करावा लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही कुठलेही टेन्डर काढताना, एस्टिमेट देताना ते टेन्डर चालू बाजार भावामध्ये घेउ शकत नाही. तुम्ही डी.एस.आय. रेटप्रमाणे घेउ शकता. आता जे नवीन डी.एस.आय. रेट आहेत. हया नवीन डी.एस.आय. रेटप्रमाणे ज्यांनी टेन्डर बनवलेले आहे तो कुठला डी.एस.आय. आहे ते बघा आणि दोन्ही कम्पॅरिझन करा. तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला सादर करा. आम्हाला हयाच्यामध्ये किती परसेन्टेज अबाउ परवडू शकेल.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला हयाच्यानंतरच्या ५० टक्के अबाउच्या निविदा नाकारता येणार नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

पुढच्या मिटींगमध्ये ५० टक्के अबाउच्या निविदा घ्यायच्या तो विषय येईल आणि मग तिथून सुरुवात होईल. मग आम्ही विरोध करु. मग त्या बाई सांगतील की तुम्ही विरोध कशाला करता ? असे होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपआयुक्त (मु.)सो.) :-**

फक्त इमारतीचे काम कधीही अबाउ राहत नाही. नॉर्मल कामापेक्षा इमारतीचे काम अबाउ असते. आपण नैतिक कॉस्टला बदलु शकत नाही.

**मा. सभापती सो. :-**

रु. ३ कोटीचा विषय रितसर येउ दया.

**प्रकरण क्र. १२७ :-**

निविदांस मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १३०:-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा यांनी श्रीम. जिवी हिरा वाडे ह्यांच्या पतीचे निधनाबाबतच्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**दु:खवटा ठराव १३१ :-**

मिरा – भाईंदर महानगरपालिकेच्या आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आणि या सदनाचे सदस्या सौ. जिवी हिरा वाडे मॅडम यांचे पती श्री. हिरा वाडे यांचे दिनांक २४ ऑक्टोबर, २००६ रोजी दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती सो. :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबददल त्यांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.२५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**